


१९३७-२०२६ ९० वर्ष

# कृषीवल

रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग

रायगड गुरुवार । दि. १५ ऑक्टोबर २०२६ । अंक १२९ । पृष्ठे ८ । किंमत ५ ₹

। आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । RGD/016/2026-28 । krushival.in


## जंजिरा किल्ल्याचे दरवाजे उघडले

**आगरदांडा :** मुरुड तालुक्यातील राजपुरी येथील ऐतिहासिक जंजिरा किल्ल्याचे दरवाजे अखेर पाच महिन्यांनंतर पर्यटकांसाठी खुले करण्यात आले आहेत. पावसाळ्यात पर्यटकांच्या सुरक्षेच्या दृष्टीने बंद ठेवण्यात आलेला हा किल्ला आता पुन्हा पर्यटकांच्या स्वागतासाठी सज्ज झाला आहे. किल्ल्याचे दरवाजे उघडल्याने पर्यटकांसह स्थानिक बोट चालक-मालकांमध्ये समाधानाचे वातावरण आहे. जंजिरा किल्ला हा पावसाळ्यात पर्यटकांच्या सुरक्षेच्या कारणास्तव शासनाकडून बंद ठेवण्यात येतो. या काळात किल्ल्याच्या आतील परिसरात तसेच तटबंदीच्या आजूबाजूला पाच ते सहा फूट उंच गवत आणि झाडेझुडपे वाढली होती. त्यामुळे सरपटणाऱ्या प्राण्यांचा •>पान २ वर






## वे|ध|क

### पतीकडून गर्भवती पत्नीवर चाकूहल्ला

**पनवेल :** पत्नीच्या चारित्र्यावर संशय घेऊन गर्भवती पत्नीवर धारदार चाकूने वार करत तिच्या डोक्यात गॅस सिलिंडर घालून हत्येचा प्रयत्न केल्याची धक्कादायक घटना उलवे सेक्टर १९ मधील बालाजी होम सोसायटीत घडली. या प्रकरणी पती निखिल सामंत (२५) याला पोलिसांनी अटक केली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, निखिल हा पत्नी भारती सामंत (२४) हिच्या चारित्र्यावर संशय घेऊन तिला वारंवार मारहाण करत होता. त्याच कारणावरून दोघांमध्ये वाद झाल्यानंतर त्याने गर्भवती भारतीवर चाकूने वार केले. त्यानंतर तिच्या डोक्यात गॅस सिलिंडर घालून हल्ला केला. या हल्ल्यात भारतीच्या मानेवर, गळ्यावर आणि चेहऱ्यावर गंभीर दुखापती झाल्या असून, तिला उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. तिची प्रकृती चिंताजनक असल्याची माहिती आहे.

### लग्नाचे आमिष दाखवून अत्याचार

**पनवेल :** तळोजा परिसरात राहणाऱ्या तरुणीला लग्नाचे आमिष दाखवून तीन वर्षे लैंगिक शोषण केल्याचा आरोप असलेल्या अमित राय (३२) याच्याविरोधात तुर्भे पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अमित राय याने दुसऱ्या तरुणीशी विवाह केल्यानंतर हा प्रकार उघडकीस आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, जुलै २०२२ मध्ये पुणे येथे अमित रायची पीडित तरुणीशी मैत्री झाली. त्यानंतर प्रेमसंबंध प्रस्थापित करून लग्नाचे आश्वासन देत जुलै २०२२ ते ऑक्टोबर २०२५ या कालावधीत विविध ठिकाणी तिच्यावर वारंवार लैंगिक अत्याचार केल्याचा आरोप पीडितेने केला आहे. पीडितेने लग्नाबाबत विचारणा सुरू केल्यानंतर अमित राय टाळाटाळ करू लागला. दरम्यान, मे मध्ये त्याने मध्य प्रदेशातील प्राची पाठक या तरुणीशी विवाह केला. ही बाब समजल्यानंतर पीडित तरुणीने तळोजा परिसरातील तुर्भे पोलीस ठाण्यात धाव घेतली.

### अनिल अंबानींवर इडीची कारवाई

**मुंबई :** देशातील नामवंत उद्योगपती अनिल अंबानी यांच्यावर गेल्या वर्षभरापासून त्यांच्या संपत्तीवर ईडीकडून कारवाई सुरू आहे. आत्तापर्यंत ९ हजार कोटींची संपत्ती जप्त करण्यात आली आहे. त्यातच, रिलायन्स पॉवर लिमिटेडची भारतातील २,०३२.८१ कोटींची मालमत्ता इडीकडून जप्त करण्यात आली आहे. परकीय चलन व्यवस्थापन कायद्याच्या कलम ३७ अंतर्गत ही कारवाई करण्यात आली. जप्त मालमत्तेत रिलायन्स पॉवरच्या बँक खात्यातील रक्कम आणि सासन पॉवर लिमिटेडमधील भागीदारीचा समावेश असल्याचे सांगण्यात आले. दरम्यान, मॉरिशसमधील परदेशी संस्थांमार्फत निधी भारतात तात्पुरता परत आणल्याचा आणि उर्वरित निधी परदेशात ठेवल्याचा आरोप करण्यात आला आहे.

# जनहितासाठी शेकापची गरज

■ अभिनेत्री श्रेया बुगडे यांचे गौरवोद्गार ■ शेकाप आयोजित महाभोंडल्यात महिलांचा उत्स्फूर्त सहभाग

**। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।**

कष्टकरी, वंचित आणि सर्वसामान्य जनतेच्या प्रश्नांसाठी शेतकरी कामगार पक्षाचे नेते व कार्यकर्ते सातत्याने काम करीत आहेत. जनतेच्या हितासाठी झटणाऱ्या या नेतृत्वाची समाजाला गरज असून, त्यांच्या कार्याला कायम पाठबळ मिळणे आवश्यक आहे, असे आवाहन मराठी सिनेअभिनेत्री श्रेया बुगडे यांनी केले. नवरात्रोत्सवानिमित्त शेतकरी कामगार पक्षाच्या अलिबाग शहर महिला आघाडीच्यावतीने बुधवारी (दि.१४) सायंकाळी श्रीबाग येथील स्व. नमिता नाईक क्रीडा संकुलात महाभोंडला आणि विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाला प्रमुख पाहुण्या म्हणून उपस्थित असलेल्या श्रेया बुगडे यांनी महिलांशी संवाद साधताना शेकापच्या सामाजिक कार्याचे कौतुक केले.

या कार्यक्रमाला अलिबागच्या नगराध्यक्षा अक्षया नाईक, शेकाप महिला आघाडी प्रमुख तथा उपनगराध्यक्षा ॲड. मानसी म्हात्रे, श्रेया बुगडे यांच्या मातोश्री नूतन बुगडे, माजी नगरसेविका वृषाली ठोसर, संजना कीर, शेकाप अलिबाग शहर महिला आघाडी प्रमुख ॲड. नीलम हजारे, सहप्रमुख ॲड. अश्विनी ठोसर, शैला भगत, ॲड. निवेदिता वाघमारे, सुषमा पाटील, संध्या पालवणकर, योजना पाटील, पंचायत समिती सदस्या अंजली ठाकूर, शेकाप तालुका महिला आघाडी प्रमुख नागेश्वरी हेमाडे, परीक्षक लक्ष्मीभाभी आदी उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या प्रारंभी शेकाप नेत्या तथा माजी राज्यमंत्री स्व. मीनाक्षी पाटील आणि माजी नगराध्यक्षा स्व. नमिता नाईक यांच्या प्रतिमांचे पूजन करून अभिवादन करण्यात आले. त्यानंतर दीपप्रज्वलन, ऐरावत पूजन आणि कुमारिका •>पान २ वर



### महिलांचा उत्साह कौतुकास्पद!

महिलांशी संवाद साधताना श्रेया बुगडे म्हणाल्या की, अलिबाग हे त्यांच्या आईचे माहेर असल्याने ते त्यांचे आजोळ आहे. शेकापच्यावतीने आयोजित महाभोंडल्याच्या कार्यक्रमात मान्यवर म्हणून सहभागी होण्याची संधी मिळाल्याचा आनंद त्यांनी व्यक्त केला. महाभोंडल्याच्या निमित्ताने अनेक महिला पारंपरिक वेशभूषेत सजून उत्साहाने सहभागी झाल्या आहेत. दैनंदिन जबाबदाऱ्या सांभाळतानाच अशा कार्यक्रमांत त्याच उमेदीने सहभागी होण्याची महिलांची वृत्ती कौतुकास्पद आहे, असे गौरवोद्गार त्यांनी काढले.

### अलिबागचे नाव जगाच्या नकाशावर

अलिबागच्या बदलत्या स्वरूपाविषयी बोलताना श्रेया बुगडे म्हणाल्या की, अलिबागचा मोठ्या प्रमाणात कायापालट झाला आहे. पुर्वी ''अलिबाग से आया क्या'' असे बोलून हिणवले जायचे, मात्र पर्यटनाच्या दृष्टीने महत्वाचे असलेल्या अलिबागमध्ये आज स्वतःचे छोटेसे घर असावे, यासाठी मोठ-मोठे सेलिब्रिटी, व्यावसायिक, क्रिकेटर अशी सर्वच मंडळी धडपडत आहेत. पर्यटनस्थळ म्हणून अलिबागने देश-विदेशातील लोकांचे लक्ष वेधून घेतले आहे. अलिबागचे नाव जगाच्या नकाशावर वेगळ्या उंचीवर पोहोचल्याचे समाधान श्रेया बुगडे यांनी व्यक्त केले.

# पाणीटंचाईने कळंबोलीकर आक्रमक




**। पनवेल । विशेष प्रतिनिधी ।**

कळंबोली वसाहतीत तीव्र पाणीटंचाई जाणवत असल्याने नागरिकांमध्ये संतापाचे वातावरण निर्माण झाले आहे. विस्कळीत पाणीपुरवठ्यामुळे त्रस्त झालेल्या नागरिकांनी सिडकोच्या कळंबोली कार्यालयात धडक देत पाणीपुरवठा विभागाच्या अधिकाऱ्यांना जाब विचारण्यास सुरुवात केली आहे. नागरिकांचा वाढता आक्रमक पवित्रा पाहता कार्यालय परिसराला पोलीस छावणीचे स्वरूप प्राप्त झाले आहे.

कळंबोलीतील विविध भागांमध्ये पुरेशा प्रमाणात पाणी मिळत नसल्याने नागरिकांना दैनंदिन गरजांसाठी •>पान २ वर

### मनसेचे बेमुदत उपोषण

कळंबोली वसाहतीतील विस्कळीत पाणीपुरवठ्याच्या प्रश्नावर महाराष्ट्र नवनिर्माण सेनेने पुकारलेले बेमुदत उपोषण दुसऱ्या दिवशीही सुरू आहे. दि.६ ऑक्टोबर रोजी सिडकोच्या कळंबोली पाणीपुरवठा विभागातील अधिकाऱ्यांची भेट घेऊन घाडगे यांनी पाणीप्रश्नावर जाब विचारला होता. यावेळी प्रशासनाला दोन दिवसांची मुदत देण्यात आली होती. मात्र, मुदत संपल्यानंतरही अपेक्षित कार्यवाही न झाल्याने सिडको कार्यालयाबाहेर बेमुदत उपोषण सुरू करण्यात आले आहे. या आंदोलनाला स्थानिक नागरिकांसह महिलांचाही पाठिंबा मिळत आहे.

### बंदोबस्त नव्हे, नियमित पाणीपुरवठा हवा!

पाण्यासाठी नागरिकांना आंदोलनाची भूमिका घ्यावी लागत असेल, तर ही प्रशासनासाठी चिंतेची बाब आहे. कार्यालयाबाहेरील पोलीस बंदोबस्तापेक्षा नागरिकांना नियमित आणि पुरेसा पाणीपुरवठा मिळणे महत्त्वाचे आहे. त्यामुळे सिडकोने पाणीटंचाईवर तातडीने कायमस्वरूपी तोडगा काढावा, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

# आयईएसपीच्या पहिल्या बॅचचे यशस्वी ‘लँडिंग’

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

रायगड जिल्ह्यातील तरुणांना कौशल्याधारित प्रशिक्षणाच्या माध्यमातून रोजगाराच्या नव्या संधी उपलब्ध करून देण्याच्या दिशेने महत्त्वपूर्ण पाऊल पडले आहे. पीएनपी एज्युकेशन सोसायटीच्या सहकार्याने कार्यरत असलेल्या आयईएसपी (इन्स्टिट्यूट फॉर एक्सलन्स इन सर्व्हिसेस अँड प्लॅनिंग) अलिबागच्या पहिल्या बॅचमधील सात विद्यार्थ्यांची नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळावर ग्राऊंड स्टाफ पदांसाठी निवड झाली आहे. या यशामुळे संस्थेच्या प्रशिक्षण उपक्रमाला प्रोत्साहन मिळाले असून, स्थानिक तरुणांसाठी विमान वाहतूक क्षेत्रातील रोजगाराची नवी दारे खुली झाली आहेत.

या निवड झालेल्या सात विद्यार्थ्यांमध्ये सहर्ष पाटील, प्रांजली प्रसाद, ऐश्वर्या देसाई, नेहा पाटील, भूषण टक्के, •>पान २ वर



■ सात विद्यार्थ्यांची नवी मुंबई विमानतळावर निवड

■ हजारो तरुणांना प्रशिक्षित करण्याचे उद्दिष्ट

### कौशल्य प्रशिक्षणातून रोजगाराच्या संधी : चित्रलेखा पाटील

रायगड जिल्ह्यातील बेरोजगारीचा प्रश्न अधोरेखित करताना पीएनपी एज्युकेशन सोसायटीच्या कार्यवाह चित्रलेखा पाटील म्हणाल्या की, बेरोजगारी ही जिल्ह्यासमोरील महत्वाची समस्या आहे. पाटील कुटुंबियांच्या माध्यमातून विविध संस्थांच्या सहकार्याने आजवर रायगड जिल्ह्यातील हजारो तरुण-तरुणींना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून दिल्या आहेत. बदलत्या काळानुसार रोजगाराच्या संधींचे स्वरूपही बदलत आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांनी पारंपरिक शिक्षणाबरोबरच विविध कौशल्याधारित अभ्यासक्रमांचे प्रशिक्षण घेणे आवश्यक आहे. ही गरज लक्षात घेऊन आयईएसपीसारख्या संस्थेच्या माध्यमातून विविध अभ्यासक्रम उपलब्ध करून देण्याचा आमचा प्रयत्न आहे. पीएनपी एज्युकेशन सोसायटी आणि आयईएसपीच्या सहकार्याने विमान वाहतूक व संबंधित सेवा क्षेत्रांत पहिल्याच बॅचमधील सात विद्यार्थ्यांना रोजगाराची संधी मिळाली, ही आमच्यासाठी अभिमानाची बाब आहे, असे त्यांनी सांगितले.

# फळ पिकांना मिळणार विमा कवच

**। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।**

बदलत्या हवामानामुळे फळ पिकांवर मोठा परिणाम होतो. हवामानातील प्रतिकूल परिस्थितीमुळे होणाऱ्या उत्पादनातील नुकसानीपासून संरक्षण देण्यासाठी विमा कवच मिळणार आहे. पुनर्रचित हवामानावर आधारित फळपीक विमा योजना अंमलात केली जाणार आहे.आंबा, काजू, सुपारी, नारळ उत्पादकांना याचा दिलासा मिळण्याची शक्यता आहे. भारतीय कृषी विमा इन्शुरन्स कंपनीमार्फत ही योजना राबविली जाणार असल्याची माहिती कृषी विभागाने दिली.

रायगड जिल्ह्यामध्ये भात पिकांबरोबरच फळ पिकांची लागवड करण्यावर मोठ्या प्रमाणात भर दिला जात आहे. आंबा, काजूसह नारळ, व सुपारीचे उत्पादन जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात घेतले जात आहे. भात पीकाला पर्यायी व्यवसाय म्हणून फळपिक लागवडीकडे पाहिले जाते. जिल्ह्यात आंब्याचे क्षेत्र १२ हजार ९५२ हेक्टर इतके असून, काजूचे क्षेत्र २ हजार ३९६ हेक्टर, नारळाचे क्षेत्र ८६३.२० हेक्टर आणि सुपारीचे क्षेत्र १ हजार २४८ हेक्टर इतके आहे. जिल्ह्यामध्ये फळ पिकांचे क्षेत्र दिवसेंदिवस वाढत आहे. तरुण वर्गांसह मध्यम वर्गातील शेतकरी फळ पीक लागवड करीत असतात. कृषी विभागाकडून त्यांना मार्गदर्शन केले जाते. मात्र, बदलत्या हवामानामुळे •>पान २ वर



### आंबा उत्पादकांना दिलासा

मागील वर्षी आंबा पीक विम्याचा हप्ता १४ हजार रुपये होता. त्यामुळे फळ पिक विमा योजनेला फारस अल्प प्रतिसाद मिळाला होता. रायगड जिल्ह्यातील वेगवेगळ्या संस्था, संघटनांसह शेतकऱ्यांनी पाठपुरावा करीत विमा हप्ता कमी करण्यात यावा, अशी मागणी केली होती. या मागणीची दखल घेत यावर्षी आंबा पिकचा विमा हप्ता १४ हजार ५०० रुपयांवरून ८ हजार ५०० रुपये करण्यात आला आहे. तसेच, विमा संरक्षण कालावधीत पंधरा दिवस अधिक वाढ केली आहे. त्यामुळे आंबा उत्पादकांना दिलासा मिळाल्याचे बोलण्यात आले आहे.

# जिल्ह्यातील भात पिकाला रोगाचे संकट

■ ५० टक्केहून अधिक उत्पादनात घट

**। रायगड । प्रमोद जाधव ।**

रायगड जिल्ह्यात सध्या भात पिकांची फुटवा, वाढ, फुलोरा आणि दाणे भरण्याची अवस्था सुरु झाली आहे. मात्र, पावसाअभावी जमीनीतील ओलावा कमी झाल्याने जमीनीला भेगा पडू लागल्या आहेत. त्यामुळे पिके पिवळे पडू लागली असून, भात पिकांवर निळे भुंगे, खोडकिडा, पाने गुंडाळणारी अळी, तुडतुडे, अशा अनेक कीड रोगांचा प्रादुर्भाव वाढला आहे. त्यामुळे यंदा भात उत्पादनात ५० टक्के घट होण्याची शक्यता वर्तविण्यात आली आहे. •>पान २ वर



### रायगडमध्येही दुष्काळ जाहीर करणार

पाण्याअभावी भात पिकांवर मोठे संकट ओढावले आहे. राज्यात दुष्काळजन्य परिस्थिती निर्माण झाली आहे. आगामी काळात चारा तुटवड्यासह भात पिकांच्या उत्पादनातही प्रचंड घट होणार आहे. याबाबत दुष्काळजन्य परिस्थितीचा आढावा घेण्यात आला. यानंतर लवकरच कॅबिनेट बैठकीत रायगड जिल्ह्यामध्ये दुष्काळ जाहीर करण्याची मागणी केली जाणार आहे, अशी माहिती पालकमंत्री भरत गोगावले यांनी दिली.

एका हातात मातृत्त्व अन् दुसऱ्या हातात मातृभूमी | आजही प्रत्येक भारतीयांच्या मनात अजरामर

# इंग्रजांना आव्हान देणारी दुर्गा : झाशीची राणी लक्ष्मीबाई

**मिलिंद मधुकर जाधव**
**श्रीवर्धन-रायगड**

काशीच्या घाटावर जन्मलेली मणिकर्णिका उर्फ मनूला वयाच्या चौथ्या वर्षी आईविना पोरकी होण्याचं दुर्दैव नशिबी आलं. वडील मोरोपंत तांबे स्वाभिमानी आणि आधुनिक विचारांचे असल्याने त्यांच्याच नेतृत्वात मनू बालवयातच विजेच्या चपळाईने तलवार चालवणे, वाऱ्याच्या वेगाने घोडेस्वारी करणे आणि तोफांना बत्ती देण्याची कामंसुद्धा शिकली.

१८४२ साली, वयाच्या अवघ्या चौदाव्या वर्षी झाशीचे राजे गंगाधरराव नेवाळकर यांच्याशी लग्न होऊन मणिकर्णिका झाशीची राणी लक्ष्मीबाई झाली. पोटच्या गोळ्याच्या विरहाचं आभाळाएवढं दुःख सहन करावं लागलं म्हणून गादीच्या वारशासाठी एक पुत्र दत्तक घेतला. पण १८५३ साली गंगाधररावांच्या मृत्यूने लक्ष्मीबाई एकाकी पडल्या. मात्र न डगमगता, घोड्यावर स्वार होऊन त्यांची तलवार पुन्हा नव्या जोमाने तळपू लागली. याचवेळी हिंदुस्थानच्या बऱ्याचशा भागात इंग्रजांच्या ईस्ट इंडिया कंपनीची सत्ता होती. दत्तक वारस नामंजूर करण्याच्या लॉर्ड डलहौसीच्या जुलमी कायद्याने झाशी खालसा करून लक्ष्मीबाईंना महालात बसवून पेन्शन सुरू केली. पण हा अन्याय लक्ष्मीबाईंना सहन झाला नव्हता. याचवेळी झाशीच्या आसमंतात तो ऐतिहासिक हुंकार घुमला ''मेरी झाँसी नहीं दूँगी!''

१८५८ साली काल्पीला जाऊन तात्या टोपेंच्या साथीने त्यांनी ग्वाल्हेर काबीज केलं. पुढे कोटा-की-सराईच्या रणांगणात दत्तक पुत्र दामोदरला पाठीवर बांधून त्या बेभान होऊन लढल्या. एका हातात मातृत्व आणि दुसऱ्या हातात मातृभूमी असं ते रोमांचकारी रूप होतं. कित्येक फिरंग्यांची मुंडकी सपासप धडावेगळी झाली, पण याच वेळी एका गोळीने त्यांच्या शरीराचा वेध घेतला आणि त्या धारातीर्थी पडल्या. त्यांना मारणाऱ्या इंग्रज सेनापती सर ह्यू रोज याने त्यांचं वर्णन ''बंडखोरांमधला एकमेव मर्द!'' असं केलं आहे. ''माझं शरीर इंग्रजांच्या हाती लागू नये'' या त्यांच्या अखेरच्या इच्छेनुसार तिथल्याच साधूंनी त्यांच्यावर अंत्यसंस्कार केले.

१८५७ च्या इंग्रजां विरुद्धच्या लढ्यातली एक अग्रणी सेनानी म्हणून त्यांचं नाव सुवर्णाक्षरात कोरलं गेलं. वयाच्या अवघ्या एकोणतीसाव्या वर्षी एक लढाऊ अध्याय देहाने शांत झाला, पण त्या तलवारीची तडफ आजही प्रत्येक भारतीयाच्या मनात अजरामर आहे. मातृभूमीच्या रक्षणासाठी लेकराला पाठीवर बांधून लढणाऱ्या, झाशीची राणी लक्ष्मीबाई यांच्या चरणी नवरात्रीची पाचवी माळ कृतज्ञतापूर्वक अर्पण.



# स्मार्ट मीटरविरोधात रोहा काँग्रेसचा एल्गार!

## नागरिकांच्या प्रश्नांवर आक्रमक | प्रशासनाकडे पाठपुरावा करण्याचा निर्धार

| चणेरा | प्रतिनिधी |

रोहा शहरातील नागरिकांना भेडसावणाऱ्या वाढीव घरपट्टी, पाणीपट्टी, स्मार्ट मीटरची सक्ती आणि अवाजवी वीजबिलांसह विविध नागरी समस्यांवर आवाज उठविण्यासाठी रोहा तालुका काँग्रेस पक्ष सज्ज झाला आहे. या प्रश्नांवर प्रशासनाकडे ठामपणे पाठपुरावा करून नागरिकांना न्याय मिळवून देण्याचा निर्धार तालुका काँग्रेसच्या आढावा बैठकीत करण्यात आला. तालुका अध्यक्ष मितेश भाई कल्याणी यांच्या अध्यक्षतेखाली मंगळवारी रोहा येथे ही बैठक पार पडली.



या बैठकीत रोहा शहरातील नागरिकांच्या दैनंदिन जीवनाशी संबंधित विविध प्रश्नांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. विशेषतः रोहा नगरपालिकेकडून आकारण्यात येणारी वाढीव घरपट्टी व पाणीपट्टी यांचा मुद्दा ऐरणीवर आला. वाढीव करांमुळे सर्वसामान्य नागरिकांवर आर्थिक भार पडत असल्याने ही वाढीव घरपट्टी व पाणीपट्टी रद्द करण्यासाठी काँग्रेस पक्षाच्या माध्यमातून पाठपुरावा करण्यात येणार असल्याचे बैठकीत स्पष्ट करण्यात आले.

वीज वितरण कंपनीकडून ग्राहकांच्या घरांमध्ये स्मार्ट मीटर बसविण्याच्या प्रक्रियेदरम्यान कोणत्याही प्रकारची जबरदस्ती करण्यात येऊ नये, अशी भूमिका बैठकीत मांडण्यात आली. स्मार्ट मीटरसंदर्भात ग्राहकांच्या मनातील शंका दूर कराव्यात आणि त्यांना येणाऱ्या अडचणींचे निराकरण करावे, अशी मागणीही करण्यात आली. त्याचबरोबर अवाजवी वीजबिलांमुळे नागरिकांना आर्थिक भुर्दंड सहन करावा लागत असल्याचा मुद्दा उपस्थित करण्यात आला. वीजबिलांबाबतच्या तक्रारींचे तातडीने निराकरण करावे, तसेच ज्येष्ठ नागरिकांना वीजबिल भरण्यासाठी होणारी गैरसोय दूर करण्यासाठी आवश्यक उपाययोजना कराव्यात, यावरही बैठकीत चर्चा झाली.

वाढीव घरपट्टी-पाणीपट्टी, स्मार्ट मीटरची सक्ती, अवाजवी वीजबिले आणि ज्येष्ठ नागरिकांच्या समस्या या प्रश्नांवर संबंधित प्रशासनाकडे पाठपुरावा करण्याचे बैठकीत ठरविण्यात आले. नागरिकांना भेडसावणाऱ्या समस्यांचे निराकरण करण्यासाठी काँग्रेस पक्षाच्या वतीने पुढाकार घेण्यात येणार असून, गरज भासल्यास या प्रश्नांवर आंदोलनात्मक भूमिका घेण्याचे संकेतही या बैठकीतून देण्यात आले.

या बैठकीला तालुका अध्यक्ष मितेश कल्याणी, जिल्हा सरचिटणीस सुनील देशमुख, जिल्हा उपाध्यक्ष अशपाक पानसरे, अल्पसंख्याक सेलचे कार्याध्यक्ष फैसल अधिकारी, जिल्हा खजिनदार रामप्रकाश कुशवाहा, ज्येष्ठ नेते बशीर भुरे, अकील लांबते, अहमद खांबरे, नवीद चौगले आदी पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

## अजगराला जीवनदान

**पाली/बेणसे :** सुधागड तालुक्यातील एकविरा गणपती मंदिरामागील परिसरात राहणाऱ्या प्रसाद यादव यांच्या घराजवळ एक आठ फूट लांबीचा अजगर आढळून आला. पालीतील सर्पमित्र दत्तात्रय सावंत यांनी या अजगराला पकडूनसुरक्षितपणे जीवनदान दिले आहे. प्रसाद यादव यांच्या परिसरामध्ये हा अजगर आल्याची माहिती मिळताच, पालीतील सर्पमित्र दत्तात्रय सावंत यांनी कोणतीही वेळ न घालवता त्वरित घटनास्थळी धाव घेतली. त्यांनी अत्यंत संयमाने आणि शिताफीने या अजगराला आपल्या नियंत्रणात आणले आणि सुरक्षितपणे पकडले. त्यानंतर वनविभागाच्या मार्गदर्शनाखाली या अजगराला त्याच्या नैसर्गिक अधिवासात सुखरूप सोडण्यात आले.



# पालीत धम्म मेळाव्याचे आयोजन

| पाली | प्रतिनिधी |

सुधागड तालुका बौद्धजन पंचायत संस्थेच्यावतीने मंगळवारी (दि.२०) ७० व्या धम्मचक्र प्रवर्तन दिन व चक्रवर्ती सम्राट अशोक विजया दशमी दिनाचे औचित्य साधून भव्य धम्म मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. हा सोहळा डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक सभागृह येथे पार पडणार आहे. या मेळाव्याचे अध्यक्षस्थान सुप्रीम कमिटी मुंबईचे अध्यक्ष मारुती गायकवाड भूषवणार असून स्वागताध्यक्ष म्हणून तालुका मध्यवर्ती कमिटीचे अध्यक्ष दीपक पवार उपस्थित राहणार आहेत. तसेच धम्मदेसना मुंबईचे भंते बुद्ध बोधी यांच्या हस्ते होणार आहे.

सकाळी नगरसेवक सुधीर भालेराव यांच्या हस्ते पंचशील ध्वजाचे ध्वजारोहणकरण्यात येणार आहे. त्यानंतर १०:३० वाजता पाली बाजारपेठेतून भव्य धम्म रॅली निघेल. ११:३० वाजता बौद्धाचार्य संघ सुधागड व माझी श्रामणेर यांच्या कडून बुद्ध पूजापाठ, दुपारी १२ वाजता स्वागत समारंभ व २२ प्रतिज्ञांचे वाचन करण्यात येणार असून, निोजित भंतेंकडून धम्मदेसना देण्यात येईल. दुपारी १:३० वाजता आरपीआय रायगड जिल्हा संपर्क प्रमुख राहुल सोनावले यांच्याकडून स्नेहभोजनाची व्यवस्था करण्यात आली आहे. त्यानंतर कार्यक्रमाचा समारोप होईल. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन तालुका मध्यवर्ती कमिटीचे सरचिटणीस नरेश शिंदे व सुप्रीम कमिटी मुंबईचे सरचिटणीस सिद्धार्थ कांबळे हे करणार आहेत. संस्थेच्यावतीने बौद्धाचार्य के.टी. गायकवाड, जी.जी. मोरे, आयु. चंद्रगुप्त भालेराव, नारायण जाधव, अशोक वाघमारे, राजेश गायकवाड, भिम महाडिक, वंदीप जाधव, आनंद जाधव, संतोष जाधव यांच्यासह सर्व उपशाखा व मध्यवर्ती कमिटीच्या पदाधिकाऱ्यांनी सर्व बौद्ध बांधव व भगिनींना या धम्म मेळाव्यास शुद्धवस्त्र परिधान करून मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन केले आहे.

# लोणेरे विद्यापीठ गरब्यात रमले

| माणगाव | प्रतिनिधी |

डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ लोणेरे येथे गरबा हा सांस्कृतिक कार्यक्रम अत्यंत उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. सोमवारी (दि.१२) सायंकाळी ५ ते रात्री ९ या वेळेत आयोजित या कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी पारंपरिक वेशभूषेत सहभागी होत गरबा आणि दांडियाचा मनमुराद आनंद घेतला. रंगीबेरंगी पोशाख, आकर्षक रोषणाई, पारंपरिक संगीत आणि दांडियाच्या ठेक्यांमुळे विद्यापीठ परिसरात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले. विद्यार्थ्यांच्या उत्स्फूर्त सहभागाने कार्यक्रमाला विशेष रंगत आली. नृत्य आणि संगीताच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना आपली कला सादर करण्याची संधी मिळाली, तसेच परस्परांतील स्नेह, एकोपा आणि सांस्कृतिक जाणीव अधिक दृढ झाली.



कुलगुरू डॉ राजनिश कामत यांच्या मार्गदर्शनाखाली या कार्यक्रमाला विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. विनोद मोहितकर यांच्या प्रमुख उपस्थितत ,कुलसचिव डॉ. सचिन पोरे, डॉ विकास सरगडे सांस्कृतिक विभाग समन्वयक तसेच परीक्षा नियंत्रक डॉ. गीतांजली महामुणकर, सांस्कृतिक विभाग समन्वयक प्रमिला पडवळ, डॉ.पल्लवी इंगळे, जनसंपर्क अधिकारी पल्लवी कदम यांची उपस्थिती लाभली. विद्यापीठातील वरिष्ठ अधिकारी आणि मान्यवर प्राध्यापकांच्या उपस्थितीमुळे विद्यार्थ्यांचा उत्साह द्विगुणित झाला. मान्यवरांनी विद्यार्थ्यांसोबत या सांस्कृतिक सोहळ्यात सहभाग घेतल्याने विद्यार्थ्यांना प्रोत्साहन मिळाले आणि संपूर्ण कार्यक्रमाला सकारात्मक ऊर्जा लाभली. त्यांच्या उपस्थितीमुळे कार्यक्रम अधिक आनंददायी, उत्साही आणि संस्मरणीय ठरला. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीसोबतच त्यांच्या सांस्कृतिक, सामाजिक आणि व्यक्तिमत्त्व विकासाला प्रोत्साहन देणारे उपक्रम विद्यापीठात आयोजित केले जातात. गरबा हा कार्यक्रम त्याचे सुंदर उदाहरण ठरला. विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद, मान्यवरांचे प्रोत्साहन आणि संगीत-नृत्याचा जल्लोष यामुळे ही गरब्याची रात्र सर्वांसाठी अविस्मरणीय ठरली.

## मुलीच्या अपहरणाचा प्रयत्न

| पनवेल | प्रतिनिधी |

साडेतीन वर्षीय मुलगी खेळत असताना तिला दहा रुपये देऊन तिचे अपहरण करण्याचा प्रयत्न केल्याप्रकरणी आरोपी विरोधात खांदेश्वर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. यातील साडेतीन वर्षीय मुलगी ही सनातन आश्रमाजवळ शिवनगर देवद येथे खेळत होती. यावेळी १३ ऑक्टोबर रोजी रात्री साडेदहाच्या सुमारास खेळत असताना आरोपीने तिला दहा रुपये दिले आणि तिचा अपहरण करण्याचा प्रयत्न केला. या प्रकरणी खांदेश्वर पोलीस अधिक तपास करत आहेत.

# पडसरे आश्रमशाळेत रस्ते सुरक्षा जनजागृती रॅली



| पाली | प्रतिनिधी |

कुलाबा जिल्हा आदिवासी सेवा मंडळ संचलित अनुदानित प्राथमिक व माध्यमिक आश्रमशाळा, पडसरे येथे सेवा संकल्प अभियानाअंतर्गत रस्ते सुरक्षा जनजागृती रॅलीचे आयोजन उत्साहात करण्यात आले. या अभियानाच्या माध्यमातून विद्यार्थी आणि पडसरे गावातील ग्रामस्थांमध्ये वाहतुकीचे नियम, रस्ते सुरक्षेचे महत्त्व आणि अपघात प्रतिबंध याविषयी प्रभावी जनजागृती करण्यात आली.

शाळेतील विद्यार्थ्यांनी शिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली हातात विविध फलक घेऊन पडसरे गावातून भव्य रॅली काढली. या रॅलीमध्ये विद्यार्थ्यांनी हेल्मेट वापरा-जीवन वाचवा, सीटबेल्ट लावा-अपघात टाळा, वेगावर नियंत्रण ठेवा आणि रस्ता सुरक्षा हीच जीवन सुरक्षा अशा विविध फलकांच्या व घोषणांच्या माध्यमातून ग्रामस्थांचे लक्ष वेधून घेतले.वाहन चालविताना मोबाईलचा वापर टाळणे, वाहतूक सिग्नलचे पालन करणे आणि वाहनाचा वेग मर्यादित ठेवणे या नियमांचे पालन करण्याचे आवाहन विद्यार्थी व शिक्षकांनी ग्रामस्थांना केले.या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक जबाबदारी व नागरिकत्वाची जाणीव निर्माण होण्यास मदत झाली. विद्यार्थ्यांच्या उत्स्फूर्त सहभागामुळे संपूर्ण पडसरे गावात रस्ते सुरक्षेबाबत सकारात्मक व जनजागृतीचे वातावरण निर्माण झाले होते. रस्ते अपघात रोखण्यासाठी प्रत्येक नागरिकाने वाहतूक नियमांचे तंतोतंत पालन करावे, या संदेशाने उपक्रमाची यशस्वी सांगता झाली.

पान १ वरुन

## जंजिरा किल्ल्याचे दरवाजे उघडले

धोका निर्माण होण्याची शक्यता होती. किल्ला पर्यटकांसाठी खुला करण्यापूर्वी गेल्या दीड महिन्यांपासून परिसरातील स्वच्छता आणि साफसफाईचे काम सुरू होते. हे काम पूर्ण झाल्यानंतर आज किल्ल्याचे दरवाजे पुरातत्त्व विभागाचे कर्मचारी कल्याण कुमार झा आणि प्रितेश जाटव यांनी उघडले. यावेळी त्यांनी पर्यटकांचे स्वागत केले. दरम्यान, जंजिरा किल्ला पाहण्यासाठी १५ वर्षांखालील मुला-मुलींना प्रवेश शुल्कातून सूट देण्यात आली आहे, तर १६ वर्षांवरील प्रत्येक व्यक्तीसाठी २५ रुपये प्रवेश शुल्क आकारण्यात येणार आहे. तसेच, पर्यटकांच्या सोयीसाठी ऑनलाइन क्यूआर कोडद्वारे शुल्क भरण्याची सुविधाही उपलब्ध करून देण्यात आली आहे, अशी माहिती पुरातत्त्व विभागाचे कर्मचारी कल्याण कुमार झा आणि प्रितेश जाटव यांनी दिली.

## पाणीटंचाईने कळंबोलीकर आक्रमक

पाण्याची जुळवाजुळव करावी लागत आहे. वारंवार उद्भवणाऱ्या या समस्येमुळे नागरिकांमध्ये नाराजी वाढत असून, त्याचा उद्रेक सिडको कार्यालयात होत आहे. नियमित आणि पुरेशा दाबाने पाणीपुरवठा करावा, अशी मागणी नागरिकांकडून केली जात आहे.

नागरिकांचा रोष लक्षात घेऊन सिडको कार्यालय परिसरात पोलिसांचा बंदोबस्त ठेवण्यात आला आहे. परिस्थितीमुळे पाणीपुरवठा विभागातील अधिकाऱ्यांना कार्यालयात येताना आणि बाहेर जाताना पोलिसांच्या गराड्यातून जावे लागत आहे. त्यामुळे कळंबोलीतील पाणीटंचाईचा प्रश्न किती गंभीर बनला आहे, हे स्पष्ट होत आहे. मात्र, पोलिसांचा बंदोबस्त हा पाणीटंचाईवरील उपाय ठरू शकत नाही. नागरिकांना दिलासा देण्यासाठी सिडको प्रशासनाने पाणीपुरवठ्यातील अडचणी दूर करून ठोस उपाययोजना करणे आवश्यक आहे. आता प्रशासन या प्रश्नावर कोणती कार्यवाही करते, याकडे कळंबोलीकरांचे लक्ष लागले आहे.

## जनहितासाठी शेकापची गरज

पूजन करून महाभोंडल्याला सुरुवात झाली. पारंपरिक वेशभूषेत सजलेल्या महिलांनी महाभोंडल्यात उत्साहाने सहभाग घेतला. नृत्यांच्या सादरीकरणातून पारंपरिक संस्कृतीचा वारसा जपण्यात आला. महिला, तरुणी आणि मान्यवरांच्या उपस्थितीमुळे संपूर्ण परिसरात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले.

## फळ पिकांना मिळणार विमा कवच

हातातोंडाशी आलेला घास जाण्याची भिती कायमच असते. अवकाळी पाऊ, जास्त तापमान अशा अनेक बदलत्या वातावरणामुळे फळ पिकांच्या उत्पादनावर त्याचा परिणाम होतो. शेतकऱ्यांनी आपल्या फळपीकासाठी नोंदणी करून निश्चित मुदतीत विमा हप्ता भरावा. या योजनेत नैसर्गिक घटकांमुळे होणाऱ्या नुकसानीसाठी संरक्षण मिळणार आहे. काजू फळपीकासाठी १ डिसेंबर ते २८ फेब्रुवारी या कालावधीत अवकाळी पाऊस, कमी तापमान आणि गारपीट यांसाठी विमा लागू राहील. या विम्याचा हप्ता दर प्रती हेक्टरी ४ हजार ८०० रुपये निश्चित करण्यात आला असून, विमा संरक्षण १ लाख २० हजार रुपये इतके आहे. आंबा फळपीकासाठी १ डिसेंबर ते ३१ मार्च तसेच ३१ मेपर्यंत अवकाळी पाऊस, तापमानातील बदल, वाऱ्याचा वेग आणि गारपीट या नैसर्गिक संकटांपासून विमा संरक्षण मिळणार आहे. या विम्याचा हप्ता दर प्रती हेक्टरी आता ८ हजार ५०० रुपये करण्यात आला आहे. १ लाख ७० हजार रुपये विमा संरक्षण आहे. नारळ पिकासाठी प्रति हेक्टरी विमा हप्ता ६ हजार ८०० रुपये असून, विमा संरक्षीत रक्कम १ लाख ७० रुपये असणार आहे. वेगाने वारा, जास्त तापमान, पाऊस, कमी पाऊस १ नोव्हेंबर ते ३१ मे पर्यंत कोसळल्यास विमा संरक्षण दिले जाणार आहे. सुपारीसाठी १ लाख रुपयांचे विमा संरक्षण आहे. त्यासाठी प्रति हेक्टरी ४ हजार विमा हप्ता असणार आहे. १ नोव्हेंबर ते ३१ मे या कालावधीत वेगाने वारा, जास्त तापमान, जास्त-कमी पाऊस असल्यामुळे नुकसान झाल्यास विमा संरक्षण दिले जाणार आहे.

तसेच, अंबिया बहारासाठी योजनेमध्ये सहभागी होण्यासाठी विमा पोर्टल २ ऑक्टोबरपासून सुरु करण्यात आले आहे. आंबा आणि काजू पिकासाठी ३० नोव्हेंबर पर्यंत असून, नारळ व सुपारी पिकासाठी ३१ ऑक्टोबरपर्यंत मुदत असणार आहे. आंब्यासाठी ६९, काजूसाठी ३८, नारळासाठी ११ आणि सुपारीसाठी ११ महसूल मंडळे अधिसुचित करण्यात आली आहेत. या योजनेत शेतकऱ्यांनी सहभाग घ्यावा असे आवाहन जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी वंदना शिंदे यांनी केले आहे.

## आयईएसपीच्या पहिल्या बॅचचे यशस्वी ‘लँडिंग’

यश सरतांडेल आणि गौतमी साळुंखे यांचा समावेश आहे. त्यांचा गौरव करण्यासाठी विशेष सत्कार समारंभाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी विद्यार्थ्यांचे पालक तसेच पीएनपी एज्युकेशन सोसायटी आणि आयईएसपीच्या पदाधिकाऱ्यांनी संयुक्तपणे विद्यार्थ्यांचा सत्कार केला. पहिल्याच बॅचमधील सात विद्यार्थ्यांना रोजगाराची संधी मिळाल्याने विद्यार्थी, पालक आणि संस्थेच्या प्रतिनिधींमध्ये आनंदाचे वातावरण होते.

यावेळी आयईएसपीचे संचालक व मुख्य कार्यकारी अधिकारी गॅरी खन्ना यांनी संस्थेच्या आगामी नियोजनाची माहिती दिली. ते म्हणाले की, येत्या तीन ते चार वर्षांत रायगड जिल्ह्यातील सुमारे पाच हजार तरुणांना प्रशिक्षण देऊन त्यांच्यासाठी रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्याचे संस्थेचे उद्दिष्ट आहे. एअरावत ग्रुप आणि पीएनपी एज्युकेशन सोसायटीच्या सहकार्याने कार्यरत असलेल्या आयईएसपीच्या माध्यमातून विमानतळ व्यवस्थापन, विमान वाहतूक, हॉस्पिटॅलिटी, ग्राहक सेवा आणि इतर सेवा क्षेत्रांशी संबंधित प्रशिक्षण दिले जाते. उद्योगक्षेत्राच्या गरजांनुसार विद्यार्थ्यांना कौशल्यसंपन्न करून रोजगारासाठी तयार करणे, हा या उपक्रमाचा प्रमुख उद्देश आहे.

नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळावर पहिल्या बॅचमधील सात विद्यार्थ्यांची झालेली निवड ही या उपक्रमातील महत्त्वाची सुरुवात मानली जात आहे. स्थानिक पातळीवर प्रशिक्षणाच्या सुविधा उपलब्ध करून देत तरुणांना रोजगारक्षम बनविण्याच्या प्रयत्नांमुळे रायगडमधील युवकांना नव्या क्षेत्रांत करिअर घडविण्याची संधी मिळत आहे. आगामी काळात अधिकाधिक तरुणांना प्रशिक्षण देऊन रोजगाराशी जोडण्याचे आव्हान आणि उद्दिष्ट आयईएसपीसमोर आहे, असे गॅरी खन्ना यांनी सांगितले.

**रायगड जिल्ह्यातील तरुणांमध्ये प्रचंड क्षमता आहे. त्यांना योग्य प्रशिक्षण, मार्गदर्शन आणि आवश्यक कौशल्ये मिळाल्यास विमान वाहतूक क्षेत्रासह वेगाने विकसित होणाऱ्या विविध सेवा क्षेत्रांत रोजगार मिळवण्याच्या संधी उपलब्ध होऊ शकतात. स्थानिक तरुणांच्या कौशल्याला प्रत्यक्ष रोजगाराच्या संधींशी जोडण्यावर आमचा विशेष भर आहे.**

**– गॅरी खन्ना, आयईएसपीचे संचालक, मुख्य कार्यकारी अधिकारी**

## जिल्ह्यातील भात पिकाला रोगाचे संकट

जिल्ह्यामध्ये भाताचे सरासरी क्षेत्र ८७ हजार ५३६ हेक्टर इतके आहे. यावर्षी २२ जून पासून पावसाने सुरुवात केली. सप्टेंबर पर्यंत ९० दिवस पावसाने हजेरी लावली. त्यामध्ये जूनमध्ये ११, जूलैमध्ये २५, ऑगस्टमध्ये ३१ आणि सप्टेंबरमध्ये २३ दिवस पाऊस कोसळला. जिल्ह्यात प्रत्यक्ष २ हजार ८९४.७ मी.मी. पाऊस पडला. मात्र, मिळालेल्या आकडेवारीनुसार यावर्षी २५० मि. मी. पाऊस कमी पडला आहे. जूलै महिन्यात सरासरी पेक्षा ५२.९ टक्के जास्त पाऊस झाला. ऑगस्ट महिन्यात कमी अधिक प्रमाणात पाऊस पडला. त्या कालावधीत सलग पावसाचा खंड झाला नाही. मात्र, सप्टेंबर महिन्यात शेवटच्या आठवड्यापासून पावसाचा खंड आढळून आला. जिल्ह्यामध्ये भात पीक बहरण्याच्या अवस्थेत असताना पावसाने दडी मारली. तसेच, तापमानात वाढ होऊन हवामान उष्ण व कोरडे झाले आहे. कित्येक दिवस पाऊस नसल्याने खाचरातील पाण्याच्या अभावामुळे भातांची रोपे पिवळी पडू लागली आहेत. तसेच, वेगवेगळ्या किड रोगांचा प्रादुर्भाव भात पिकांवर झाला आहे. त्यामुळे अलिबागसह श्रीवर्धन, मुरूड, पेण, खालापूर, कर्जत, तळा, उरण, पोलादपूर, पाली, पनवेल, रोहा, माणगाव, म्हसळा, महाड, तालुक्यांतील भात पिकांच्या उत्पादनात २५ ते ८० टक्केपर्यंत घट होण्याची शक्यता कृषी विभागाने व्यक्त केली आहे. त्यामध्ये पोलादपूर, रोहा व तळा तालुक्यामध्ये ८० टक्के, पेण, अलिबाग, माणगांव व पालीमध्ये ४० टक्के, खालापूर, पनवेल, मुरूड, म्हसळा व कर्जतमध्ये २५ टक्के आणि महाडमध्ये ३० टक्के घट होण्याची शक्यता वर्तविली जात आहे.

# पावसाच्या दडीने उरणवर पाणीटंचाईचे संकट

| उरण | प्रतिनिधी |

पावसाने दडी मारली, तळी-विहिरींचे अस्तित्व धोक्यात आले आणि दुसरीकडे द्रोणागिरी नोडसह विविध विकास प्रकल्पांमुळे उरणच्या लोकसंख्येत झपाट्याने वाढ होत आहे. वाढती लोकसंख्या आणि पाण्याची वाढती मागणी यांचा ताळमेळ घालायचा कसा, असा प्रश्न आता उभा ठाकला आहे. पावसाचा खंड असाच कायम राहिला, तर उरणकरांना पाणीटंचाईच्या झळा सोसाव्या लागण्याची शक्यता आहे. त्यामुळे नागरिकांनी पाणी जपून वापरावे आणि प्रशासनाने संभाव्य संकटाची वाट न पाहता आतापासूनच ठोस उपाययोजनांसाठी कंबर कसावी, असे आवाहन करण्यात आले आहे.

एकेकाळी उरण तालुक्यात तळी आणि विहिरी मोठ्या प्रमाणावर होत्या. गावोगावी असलेले हे जलस्रोत स्थानिकांच्या पाण्याच्या गरजा भागविण्यासाठी महत्त्वाचे ठरत होते. मात्र, वाढते नागरीकरण, विकास प्रकल्प आणि बदलत्या परिस्थितीत यातील अनेक तळी-विहिरी नामशेष झाल्याचे चित्र आहे. आता त्यांची संख्या हाताच्या बोटांवर मोजण्याइतकी उरल्याची चिंता व्यक्त केली जात आहे. त्यातच उरणच्या पाणीपुरवठ्याचा आधार असलेली धरणेही अनेक दशकांपूर्वीची असल्याने वाढत्या लोकसंख्येच्या तुलनेत पाण्याचे नियोजन किती सक्षम आहे, याचा आढावा घेण्याची गरज निर्माण झाली आहे.

द्रोणागिरी नोडसह विविध औद्योगिक आणि नागरी प्रकल्पांमुळे उरण परिसरात लोकवस्ती वाढत आहे. लोकसंख्या वाढली की पाण्याची मागणीही वाढणारच; मात्र त्याच प्रमाणात जलस्रोत आणि पाणीपुरवठा व्यवस्था सक्षम झाली आहे का, हा खरा सवाल आहे. गेल्या अनेक दिवसांपासून पावसाने ओढ दिल्याने उपलब्ध पाणीसाठ्यावर परिणाम होण्याची भीती आहे. अशा परिस्थितीत पाणीपुरवठ्याचे योग्य नियोजन झाले नाही, तर भविष्यात नागरिकांना पाण्यासाठी धावपळ करावी लागू शकते. पावसाने दडी मारली असताना पाण्याचा अपव्यय करणे म्हणजे संभाव्य संकटाला निमंत्रण देण्यासारखे आहे. नळ उघडे ठेवून पाणी वाया घालवणे, पाइपलाइनमधील गळतीकडे दुर्लक्ष करणे, वाहनांची अनावश्यक धुलाई करणे आणि गरजेपेक्षा जास्त पाणी वापरणे टाळले पाहिजे. घरगुती वापरासाठी आवश्यक तेवढेच पाणी वापरणे, गळती तातडीने दुरुस्त करणे आणि प्रत्येक थेंबाचे महत्त्व ओळखणे ही काळाची गरज आहे. आज ‘‘पाणी वाचवा, उद्याचे संकट टाळा’’ हा संदेश केवळ घोषवाक्य न राहता प्रत्येक नागरिकाने प्रत्यक्ष कृतीत उतरवला पाहिजे. मात्र, नागरिकांना पाणी बचतीचे आवाहन करून प्रशासनाला आपली जबाबदारी झटकता येणार नाही. उरणच्या पाणीपुरवठा योजनेची सद्यस्थिती, उपलब्ध पाणीसाठा, वाढती लोकसंख्या आणि आगामी काळातील पाण्याची संभाव्य मागणी यांचा तातडीने आढावा घेणे आवश्यक आहे. पाणीगळती रोखणे, वितरण यंत्रणेची तपासणी करणे, पर्यायी पाणीपुरवठ्याचे नियोजन करणे आणि पाणी बचतीबाबत व्यापक जनजागृती करणे यासाठी संबंधित यंत्रणांनी ठोस पावले उचलावीत.

संकट ओढवल्यानंतर धावपळ करण्यापेक्षा संकट येण्यापूर्वीच नियोजन करा! उरणमध्ये पाणीटंचाई निर्माण झाल्यानंतर उपाययोजना शोधण्याची वेळ येऊ नये. वाढत्या लोकसंख्येचा विचार करून दीर्घकालीन जलनियोजन करणे, उपलब्ध जलस्रोतांचे संवर्धन करणे आणि भविष्यातील पाणीपुरवठ्याची गरज लक्षात घेऊन कृती आराखडा तयार करणे आवश्यक आहे. पाण्याचा अपव्यय रोखण्याची जबाबदारी नागरिकांची, तर नियोजनबद्ध आणि पुरेसा पाणीपुरवठा सुनिश्चित करण्याची जबाबदारी प्रशासनाची आहे.

## गळफास घेऊन आत्महत्या

| पनवेल | प्रतिनिधी |

घराच्या दरवाजाला कडी लावून ओढणीच्या साह्याने गळफास घेतल्याचा प्रकार वलप, तालुका पनवेल येथे उघडकीस आला. याची नोंद पनवेल तालुका पोलीस ठाण्यात १३ ऑक्टोबर रोजी करण्यात आली. संजय शंकर इंगळे याने राहत्या घरात दरवाजाला आतून कडी लावली आणि ओढणीच्या साहाय्याने गळफास घेतला. त्याच्या आत्महत्येचे कारण समजू शकलेले नाही.

# कवितेतून लोकप्रतिनिधींच्या डोळ्यात अंजन!

- **हमरापूर विभागातील खड्डेमय रस्त्यांचा प्रश्न ऐरणीवर**
- **साक्षी मोकलचा व्हिडीओ समाज माध्यमांवर चर्चेत**

| हमरापूर | प्रतिनिधी |



हमरापूर विभागातील खड्डेमय रस्त्यांच्या दुरवस्थेवर आता एका चिमुकलीनेच आपल्या कवितेतून लोक प्रतिनिधींना जाब विचारला आहे. कलवे येथील साक्षी निकेत मोकल या चिमुकलीने कलवे ॲक्सिस बँकेजवळील रस्त्याची दुर्दशा दाखवणारा व्हिडीओ आपल्या अनोख्या शैलीत तयार केला असून, तिच्या या व्हिडीओची समाजमाध्यमांवर जोरदार चर्चा सुरू आहे.

विशेष म्हणजे, पावसाळ्यात याच हमरापूर विभागातील नागरिकांनी रस्त्याच्या प्रश्नासाठी ठिय्या आंदोलन केले होते. मात्र, आंदोलनानंतरही अपेक्षित सुधारणा झालेली नसल्याची नागरिकांची नाराजी आहे. नागरिकांच्या आंदोलनानंतरही न जागे झालेले लोकप्रतिनिधी आता एका चिमुकलीच्या कवितेने तरी जागे होणार का? असा सवाल उपस्थित होत आहे. जनतेच्या समस्यांकडे दुर्लक्ष करणाऱ्या लोकप्रतिनिधींसाठी साक्षीचा हा व्हिडीओ म्हणजे आरसा ठरला आहे. आता तरी संबंधित प्रशासन आणि लोकप्रतिनिधी या रस्त्याच्या दुरुस्तीसाठी ठोस पावले उचलणार का, याकडे लक्ष लागले आहे.

# कर्जतची वाहतूक कोंडी ठरते नागरिकांची डोकेदुखी

| कर्जत | प्रतिनिधी |

कर्जत शहरातील नवीन श्रीराम पुलावरील खड्डे आणि मुख्य बाजारपेठ तसेच चार फाटा परिसरातील वाहतूक कोंडीच्या गंभीर प्रश्नांकडे प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी कर्जत शहर बचाव समितीच्यावतीने तहसीलदार डॉ. धनंजय जाधव यांना निवेदन सादर करण्यात आले. नवीन श्रीराम पुलावर मोठ्या प्रमाणात खड्डे पडल्याने वाहनचालकांना अनेक अडचणींचा सामना करावा लागत असून, अपघातांचा धोकाही वाढला आहे. तसेच, कर्जत शहरातील मुख्य बाजारपेठ आणि चार फाटा परिसरात वारंवार होणाऱ्या वाहतूक कोंडीमुळे नागरिक, व्यापारी आणि वाहनचालक त्रस्त झाले आहेत. या समस्येवर केवळ तात्पुरते उपाय न करता कायमस्वरूपी तोडगा काढण्याची आवश्यकता असल्याचे समितीने निवेदनात नमूद केले. यावेळी ॲड. कैलास मोरे, प्रवीण गांगल, रंजन दातार, स्विटी बार्शी, राकेश देशमुख, कृष्णा जाधव आदी उपस्थित होते.



### प्रशासनाच्या संयुक्त बैठकीची मागणी

शहरातील वाहतूक कोंडी आणि रस्त्यांच्या समस्यांवर प्रभावी उपाययोजना करण्यासाठी तहसीलदारांच्या अध्यक्षतेखाली पोलीस प्रशासन, नगरपरिषद आणि संबंधित विभागांच्या अधिकाऱ्यांची संयुक्त बैठक आयोजित करण्यात यावी, अशी मागणी करण्यात आली. या बैठकीत समस्यांचा सविस्तर आढावा घेऊन त्यावर ठोस निर्णय घ्यावेत आणि संबंधित कामांना तातडीने सुरुवात करावी, अशी भूमिका समितीने मांडली. कर्जत शहरातील नागरिकांच्या दैनंदिन समस्या सोडविण्यासाठी प्रशासनाने गांभीर्याने लक्ष देऊन तातडीने कार्यवाही करावी, अशी देखील मागणी कर्जत शहर बचाव समितीच्यावतीने करण्यात आली.

# शेकापच्या महाभोंडल्यात महिलांनी धरला फेर










नवरात्रौत्सवाच्या निमित्ताने शेकाप शहर महिला आघाडीच्या वतीने अलिबागमध्ये महाभोंडला आणि विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमात सिने अभिनेत्री श्रेया बुगडे यांनी सहभाग घेऊन सांस्कृतिक परंपरा जपली. त्यांच्यासमवेत अलिबागच्या नगराध्यक्षा अक्षया नाईक, उपनगराध्यक्षा ॲड. मानसी म्हात्रे, ॲड. निलम हजारे, वृषाली ठोसर, संजना कीर, ॲड. अश्विनी ठोसर, शैला भगत, ॲड. निवेदिता वाघमारे, सुषमा पाटील, संध्या पालवणकर, योजना पाटील, अंजली ठाकूर, नागेश्वरी हेमाडे आदी महिला उपस्थित होत्या. दरम्यान अलिबागच्या नगराध्यक्षा अक्षया नाईक यांनी अभिनेत्री श्रेया बुगडे यांना वाण देऊन त्यांचा सन्मान करण्यात आला. तसेच अन्य मान्यवरांचेही वाण देऊन सन्मान करण्यात आला. यावेळी अलिबागमधील महिलांनी गाण्यांच्या तालावर फेर धरला होता. (छायाचित्र : समीर मालोदे)

# म्हसळा तालुक्यात ठेकेदारांमुळे पाणीबाणी

## कारवाई करण्याची नागरिकांची मागणी

**। म्हसळा । प्रतिनिधी ।**

सरकारच्या हर घर जल अभियानांतर्गत जलजीवन मिशन योजनेतून म्हसळा तालुक्यात कोट्यवधी रुपयांच्या पाणीपुरवठा योजनांना मंजुरी देण्यात आली आहे.मात्र, निधीअभावी काही योजनांची कामे संथ गतीने सुरू असून काही योजनांचे काम निकृष्ट झाले आहे.तोंडसुरे प्रादेशिक नळपाणीपुरवठा योजनेचे काम पूर्णपणे ठप्प असल्याची स्थिती आहे.त्यामुळे नागरिकांना भविष्यात तीव्र पाणीटंचाईचा सामना करावा लागू नये यासाठी रखडलेल्या योजनांची कामे तातडीने पूर्ण करावीत आणि कामे सुरू न करणाऱ्या तसेच निष्काळजीपणा करणाऱ्या ठेकेदारांवर कारवाई करावी अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

म्हसळा शहराच्या पाणीपुरवठा योजनेसाठी पाभरे धरणातील जलस्रोत निश्चित करण्यात आला आहे तर तोंडसुरे प्रादेशिक नळपाणीपुरवठा योजनेला खरसई धरण प्रकल्पातून पाणीपुरवठा करण्याचे नियोजन आहे.या महत्त्वाकांक्षी योजनांमुळे तालुक्यातील नागरिकांचा पाणीप्रश्न कायमस्वरूपी सुटेल अशी अपेक्षा व्यक्त केली जात होती मात्र प्रत्यक्षात कामांची संथ गती आणि विविध अडचणींमुळे या अपेक्षांवर पाणी फिरण्याची शक्यता निर्माण झाली आहे. खासदार सुनिल तटकरे यांच्या निर्देशानंतरही तोंडसुरे योजनेचे काम ठप्प आहे.

तोंडसुरे प्रादेशिक पाणीपुरवठा योजनेच्या कामाचा खासदार सुनील तटकरे यांनी आढावा बैठकीत आढावा घेऊन संबंधितांना आवश्यक निर्देश दिले होते. तरीदेखील या योजनेचे काम पूर्णपणे ठप्प असल्याचे चित्र आहे. त्यामुळे संबंधित यंत्रणेच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह उपस्थित होत असून, वरिष्ठ लोकप्रतिनिधींनी दिलेल्या निर्देशांची प्रभावी अंमलबजावणी होत आहे का, असा सवाल नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे. सदोष कामांचा फटका सर्वसामान्यांना तालुक्यातील अनेक गावांमध्ये पाणीपुरवठा योजनांच्या कामांत विविध त्रुटी असल्याच्या तक्रारी आहेत. नियोजनातील त्रुटी, शासकीय यंत्रणेच्या कामातील चुका आणि ठेकेदारांकडून मनमानी पद्धतीने करण्यात आलेली कामे यामुळे काही योजना सदोष ठरत असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे.परिणामी योजनांवर मोठ्या प्रमाणात खर्च होऊनही अपेक्षित लाभ मिळत नसल्याची परिस्थिती निर्माण झाली आहे.अशा कामांची तांत्रिक तपासणी करून दोषींवर जबाबदारी निश्चित करण्याची गरज व्यक्त होत आहे.



**पाणीटंचाईपूर्वी कामे पूर्ण करण्याची मागणी**

यंदा पर्जन्यमान कमी झाल्याने म्हसळा तालुक्यात दुष्काळसदृश परिस्थिती निर्माण होण्याची भीती व्यक्त केली जात आहे. अशा परिस्थितीत रखडलेल्या पाणीपुरवठा योजनांचा प्रश्न अधिक गंभीर होऊ शकतो. त्यामुळे मंत्री आदिती तटकरे आणि खासदार सुनील तटकरे यांनी संबंधित शासकीय अधिकारी व ठेकेदारांना पुन्हा निर्देश देऊन मंजूर योजनांची अपूर्ण कामे तातडीने पूर्ण करण्यासाठी पुढाकार घ्यावा अशी मागणी नागरिकांनी केली आहे.पाणीटंचाईचा प्रश्न तीव्र होण्याची वाट न पाहता प्रशासनाने आतापासूनच ठोस उपाययोजना कराव्यात. कामांमध्ये दिरंगाई करणाऱ्या ठेकेदारांना जबाबदार धरून नियमानुसार कारवाई करावी तसेच सदोष कामांची चौकशी करून नागरिकांना सुरक्षित व नियमित पाणीपुरवठा उपलब्ध करून द्यावा अशी अपेक्षा नागरिकांकडून व्यक्त होत आहे.

## आरटीओ अधिकाऱ्यासह कारकुनाची चौकशी

**। पनवेल । प्रतिनिधी ।**

नवी मुंबई लाचलूचपत विभागाने पनवेल येथील एक आरटीओ अधिकारी आणि क्लार्कची चौकशी केली आहे. सप्टेंबर महिन्यात लाच घेताना सापडलेलाएकाएजंटच्याप्रकरणात आरटीओचा एक अधिकारी आणि एका कारकून यांची नावे आली होती. खारघर येथील आरटीओ कार्यालयासमोरील रस्त्यावर लाच घेताना आरटीओ एजंटला लाच लुचपत विभागाने रंगेहात पकडले होते. रिक्षा ट्रान्सफर करण्यासाठी आरटीओ एजंटने शासकीय फी व्यतिरिक्त अधिकच्या साडेचार हजार रुपयाच्या रकमेची मागणी केली होती. याबाबत तक्रारदाराने आरटीओचा एक अधिकारी आणि क्लार्कची नावे देखील तक्रारीत दिली होती. या अनुषंगाने आरटीओ एजंटवर गुन्हा दाखल करण्यात आला.

## पेणमध्ये सेवा संकल्प अभियानाचे आयोजन

**। पेण । प्रतिनिधी ।**

पेण तहसील कार्यालयामार्फत १७ सप्टेंबर ते १७ ऑक्टोबरदरम्यान सेवा संकल्प अभियान राबविण्यात आले. नागरिकांना विविध शासकीय योजनांचा लाभ, दाखले व शासकीय सेवा सुलभतेने उपलब्ध करून देणे हा या अभियानाचा उद्देश होता.

यावेळी त्यांनी संपूर्ण रायगड जिल्हा दुष्काळग्रस्त घोषित करण्यासाठी मंत्रालय स्तरावर प्रयत्न करणार असल्याचे सांगितले. केवळ एका तालुक्याला दुष्काळग्रस्त घोषित करून रायगड जिल्ह्यातील शेतकऱ्यांचे प्रश्न सुटणार नाहीत, असे त्यांनी स्पष्ट केले.

यावेळी पेण पंचायत समितीच्या सभापती स्मिता पाटील, जिल्हा परिषद सदस्य प्रभाकर म्हात्रे, पेणच्या नगराध्यक्षा प्रीतम पाटील, प्रांताधिकारी प्रविण पवार, तहसीलदार तानाजी शेजाळ, साकव संस्थेचे सचिव अरुण शिवकर, सभापती स्मिता पेणकर, नगरसेविका पल्लवी कालेकर, नगरसेवक मितेश शहा, नायब तहसीलदार प्रसाद कालेकर व नितीन परदेशी आदी मान्यवर उपस्थित होते.

या अभियानांतर्गत विविध योजनांच्या लाभार्थ्यांना धनादेश व प्रमाणपत्रांचे वाटप करण्यात आले, तर काही शेतकऱ्यांना टिल्लरचे वाटप करण्यात आले. कार्यक्रमस्थळी विविध शासकीय विभागांचे स्टॉलही उभारण्यात आले होते. अभियान यशस्वी करण्यासाठी तहसील कार्यालयाने विशेष मेहनत घेतली.

दरम्यान, या कार्यक्रमाला पेण पंचायत समितीचे गटविकास अधिकारी व इतर अधिकारी अनुपस्थित असल्याची चर्चा कार्यक्रमस्थळी रंगली होती. यावेळी कृषी सभापती वैकुंठ पाटील आणि तहसीलदार तानाजी शेजाळ यांनी प्रसारमाध्यमांशी संवाद साधला.



## विद्यालयात सायबर जनजागृती

**। आगरदांडा । प्रतिनिधी ।**

तालुक्यातील यशवंतनगर पंचक्रोशीतील सि.एस.एन.विद्यालयात सायबर जनजागृती कार्यक्रम नुकताच घेण्यात आला. पोलीस अतुल बागवे व सुमित वाकार्डे यांनी यावेळी विद्यालयातील शिक्षक व विद्यार्थ्यांना सायबर गुन्ह्यांविषयी माहिती देऊन फसवणूक झाल्याचे लक्षात येताच एक तासाच्या आत १९३० या क्रमांकावर आपली तक्रार नोंदवल्यास असे गुन्हे त्वरित उघडकीस आणले जाऊ शकतात, अशी माहिती दिली. आजकालच्या जमान्यात थेट चोरी, डाके तसेच दरोड्यांचे प्रमाण कमी झाले असले तरी सायबर गुन्ह्यांमध्ये वाढ झाली आहे.त्याकरीता सर्वांनी सजग राहून मोबाईल वरुन येणारे फ्रॉड कॉल, मेसेजेसला बळी न पडता केवळ जरुरी पुरतेच वापर करण्याचे आवाहन त्यांनी उपस्थितांना केले.

**परसबागेतील फुलांना नवरात्रीत मागणी | ग्राहकांना स्वस्त दरात ताजी फुले उपलब्ध**

# आदिवासी महिलांना मिळाला रोजगार

**। पाली /बेणसे । प्रतिनिधी ।**

जिल्ह्यासह सुधागड तालुक्यातील अनेक आदिवासी वाड्या-पाड्यांवरील आदिवासी बांधवांनी आपल्या परसात व रानमाळावर अस्टर व झेंडूच्या फुलांची लागवड केली असून, सध्या या फुलांचे भरघोस उत्पादन येत आहे.

विशेष म्हणजे अवघ्या १० ते २० रुपयांमध्ये फुलांची एक जुडी मिळत असल्याने ग्राहकांना अत्यंत स्वस्त दरात ताजी व टवटवीत फुले उपलब्ध होत आहेत. सध्या नवरात्रोत्सवाच्या पार्श्वभूमीवर देवीच्या पूजेसाठी व सजावटीसाठी या फुलांना आणि हारांना मोठी मागणी आहे.

जिल्ह्यात पुणे व वाशी येथील मंडईतून देखील झेंडूची फुले येतात.




मात्र, येथील आदिवासींनी पिकवलेल्या झेंडूच्या व अस्टरच्या फुलांना स्थानिक पातळीवर उत्तम प्रतिसाद मिळत आहे. अनेक आदिवासी बंधू-भगिनी टोपलीमध्ये ही फुले भरून घरोघरी व बाजारात विक्रीसाठी नेत आहेत, ज्यामुळे नागरिकांना अगदी सहजपणे फुले उपलब्ध होत आहेत. ही फुले विकून आदिवासींच्या हाताला काम आणि चार पैसे मिळत असल्याने त्यांना चांगला रोजगार उपलब्ध झाला आहे.

अस्टरच्या फुलांच्या एका जुडीत अस्टरची दहा रंगीबेरंगी फुले मिळतात, तर झेंडूच्या फुलांच्या जुडीत दहापेक्षा अधिक मोठी, टवटवीत व ताजी फुले मिळतात. पहाटे लवकर उठून डोक्यावर फुलांची टोपली घेऊन आदिवासी महिला व पुरुष विक्रीसाठी बाजारात येतात; यासाठी ते मोठी मेहनत आणि कष्ट घेतात.

सध्या नवरात्रोत्सव मोठ्या उत्साहात साजरा केला जात आहे. घरोघरी घटस्थापना, देवीची आरास, मखर सजावट तसेच सार्वजनिक मंडळांमध्ये देवीच्या स्वागतासाठी फुलांची गरज असते. अशा वेळी पूजेसाठी, देवीच्या फोटोला किंवा मूर्तीला वाहण्यासाठी तसेच आकर्षक फुलांच्या सजावटीसाठी या स्थानिक अस्टरच्या व झेंडूच्या फुलांचा मोठ्या प्रमाणावर वापर केला जात आहे.

याबाबत बोलताना सुधागड तालुक्यातील चेरफळवाडी येथील फुलविक्रेता रघुनाथ शिद म्हणाले की, यंदा पाऊस खूप कमी पडला आहे. मात्र सध्या फुलांच्या पिकाचा बहर चांगला येत आहे. नवरात्र आणि आगामी दिवाळी सणांमध्ये फुलांची विक्री वाढते. जास्त जुड्या घेतल्यास पन्नास रुपयाला सहा ते सात जुड्या देखील देतो. परंतु काही ग्राहक दहा रुपयाला दोन जुड्या मागतात, ते आम्हाला परवडत नाही.

# म्हणे, उत्तम कारभारी!

कोणत्याही गोष्टीचे परिणाम काय होतील याचा विचार करून निर्णय घ्यावा हा अगदी रोजच्या व्यवहारातला साधा नियम आहे. पण आपल्या सर्व सरकारांचा कारभार उफराटा असतो. ती आधी निर्णय करतात. त्यावर लोक टीका करू लागतात. मग सरकारातील मंडळी त्यावर विचार करू लागतात. मग आपल्याच निर्णयाला स्थगिती देण्याची वेळ सरकारवर येते. हे असे एखाद-दोन वेळा नव्हे तर वारंवार होते. यूपीआयवरील शुल्क दिवाळीपर्यंत लागू होणार नाही हा सरकारचा ताजा निर्णय म्हणजे सरकारच्या अशाच अकार्यक्षमतेचा पुरावा आहे. दोन हजार रुपयांवरील व्यवहारांवर शुल्क लागू करण्याचे सरकारने अलिकडेच जाहीर केले होते. याचे सूतोवाच लोकसभेच्या गेल्या अधिवेशनातच करण्यात आले होते. म्हणजे सरकार पातळीवर त्याचा बराच काथ्याकूट झाला असेल असे समजायला हरकत नाही तरीही हा निर्णय जाहीर केल्यावर असा झटपट माघारी घ्यावा लागतो यावरून सरकारचे मंत्री आणि बाबू लोक यांचा वकूब दिसतो. आधीच सध्या मंदीचे आणि दुष्काळाचे वातावरण आहे. युध्द वगैरे इतर कारणांमुळे महागाईही झालेली आहे. त्यात आता यूपीआय शुल्काची भर पडणार असल्याने व्यापारी वैतागले. सध्या मध्यमवर्गातले अनेक लोक फ्रीज, टीव्ही, छोटी वाहने अशासारख्यांची खरेदी करतानाही यूपीआयवरून पेमेंट करत असतात. यावर शुल्क लागू झाल्याने व्यापारी व ग्राहक दोहोंचीही अडचण होणार होती. म्हणजे ग्राहकांना एक तर पुन्हा डेबिट कार्डाकडे वळावे लागणार होते किंवा रोख रकमा देऊन व्यवहार करावे लागणार होते. या दोन्ही गोष्टी अनेक रीतीने गैरसोयीच्या आहेत. युपीआय पेमेंट हे मोबाईलच्या एका क्लिकवर होऊ शकते. म्हणून तर ते इतके लोकप्रिय झाले. ऐन दिवाळीच्या हंगामात यावर अशी गदा आल्याने व्यापारी मंडळींनी विरोधाचा मोठा आवाज काढला. आपल्या सरकारला शेतकरी, विद्यार्थी, बँक कर्मचारी वगैरे अन्य कोणाचेही निषेध कधी ऐकू येत नाहीत. व्यापाऱ्यांचा मात्र छोट्यातला छोटा आवाज लगेच सरकारच्या कानावर पडतो व सरकार त्यांचे ऐकते. त्यानुसार आता हे शुल्क दिवाळीनंतर लागू होणार आहे.

### अदानीची मनमानी

शुल्क स्थगितीचा निर्णय स्वागतार्हच आहे. पण आता पुन्हा लागू करताना तरी त्याचा नीट विचार व्हावा. खरे तर असे निर्णय घेण्यापूर्वी संबंधित सर्वांशी, ज्याला इंग्रजीत स्टेकहोल्डर्स म्हणतात, बोलणे आवश्यक असते. पण आपल्या महामहीम नरेंद्र मोदी आणि तमाम मंडळींना त्याची गरज वाटत नाही. याचाच आणखी एक मासला मुंबई विमानतळ हलवण्याबाबतच्या निर्णयात दिसला. टर्मिनल एक म्हणजे सांताक्रूझचा जुना विमानतळ बंद करून तिथली विमान उड्डाणे २५ ऑक्टोबरपासून नवी मुंबईच्या विमानतळारून होतील असा निर्णय अदानीने जाहीर केला. अदानीने असे म्हटले कारण मुंबई विमानतळाचे व्यवस्थापन त्याच्याकडे आहे. नवी मुंबई विमानतळ बांधून तयार आहे. पण तेथून उड्डाणे करायला अजून विमान कंपन्या तयार नाहीत. सांताक्रूझ हा मुंबईत सर्वांना सोईचा व वर्षानुवर्षांच्या सवयीचा आहे. पश्चिम उपनगरातील बोरीवली असो की ठाणे इथपर्यंतचे लोक साधी रिक्षा करून या विमानतळापर्यंत अर्धा ते एक तासात पोचू शकतात. पण नवी मुंबई विमानतळाचे तसे नाही. अगदी नवी मुंबई किंवा चेंबूर वगैरेचे लोक सोडले तर बाकी मुंबईतील कोणत्याही भागातून येथे येण्यासाठी सोईस्कर अशी वाहतूक सुविधा नाही. त्यामुळे किमान अडीच तीन तास आणि एक-दोन हजार रुपये घालवून मगच नवी मुंबई विमानतळापर्यंत पोचता येईल अशी बहुतेक मुंबईकरांची स्थिती आहे. वास्तविक नवीन विमानतळ करण्यापूर्वीच तेथे पोचण्यासाठी बस किंवा मेट्रो यांची सोय करायला हवी होती. पण त्यांचे नियोजन आता सुरु झाले आहे. आता दादर किंवा पुण्याहून गाड्या सोडण्यासाठी एसटीला दावणीला बांधण्यात आले आहे. हे एसटीच्या किती फायद्याचे आहे याची कल्पना नाही. पण राज्यकर्त्यांना आपण सुविधा दिली आहे असे सांगण्यासाठी ते उपयोगी आहे. यामुळे सांताक्रूझमधून हलण्यास बहुतेक विमान कंपन्या नाराज होत्या. शिवाय त्यांनीही दिवाळी तसेच नाताळच्या सुट्यांच्या हंगामाचे कारण पुढे केले. या हंगामातील तिकिटविक्री आधीपासून झाली आहे. आता उड्डाणे वेगळ्या ठिकाणाहून व वेगळ्या वेळी केल्याने त्यांना त्रास होणार हे उघड होते.

### डेटा सेंटर्स

सर्वात कहर म्हणजे विमानतळ हलवण्याबाबत विमान वाहतूक कंपन्या जसे की एअर इंडिया, इंडिगो इत्यादी, यांच्याशी चर्चाच केली गेली नव्हती. अदानीच्या कंपनीने मात्र ही चर्चा झाली आहे असे जाहीर केले. त्यावर अशी चर्चा कधी झाली ते सांगा व त्या बैठकीचे कामकाज जाहीर करा असे आव्हानच अदानीला दिले. त्यामुळे मग मोदी सरकारने हस्तक्षेप केला व आपल्या मित्राची अब्रू वाचवली. याचा अर्थ कोणालाही विचारात न घेता किंवा मागचा पुढचा विचार न करता केवळ स्वतःच्या फायद्यासाठी अदानीची कंपनी हा निर्णय घेऊ पाहत होती. असेच आणखी एक उदाहरण म्हणजे डेटा सेंटर्सचे आहे. नवी मुंबई व परिसरात यापूर्वीच अनेक कंपन्यांची डेटा सेंटर्स आहेत. याखेरीज ठाणे व नवी मुंबईत आणखी अतिप्रचंड डेटा सेंटर्स आणण्यासाठी परदेशी कंपन्यांशी राज्य सरकारने यापूर्वीच करार केले आहेत. मोठ्या वाजतगाजत तशा घोषणा झाल्या आहेत. खुद्द ठाणे शहरात तसेच पलावामध्ये अमेझॉन आणि तळोजा, पनवेल वगैरे भागांमध्ये ब्लॅकस्टोन, एसटीटी, एनटीटी, रिलायन्स अशांची डेटा सेंटर्स येऊ घातली आहेत. डेटा सेंटर्ससाठी प्रचंड क्षमतेचे सर्व्हर्स लागतात व एकूण यंत्रणा थंड ठेवण्यासाठी तितकेच प्रचंड पाणी लागते. हे पाणी लगतच्या रायगड जिल्ह्यातून घेतले जाणार आहे. लोकांच्या पिण्याच्या व शेतीच्या पाण्यावर त्यामुळे आच येणार आहे. त्याचे इतरही दुष्परिणाम आहेत. त्यामुळे या डेटा सेंटर्सना जगभरात विरोध होत आहे. अमेरिकेत तर एक वर्षापर्यंत नवी सेंटर उघडण्यास बंदी करण्यात आली आहे. आपल्याकडे मात्र सरकार दणादण करार करून मोकळे झाले आहे. मात्र आता त्याबाबत लोकांमध्ये विरोध होईल हे लक्षात आल्यावर फडणवीस सरकारने डेटा सेंटरच्या परिणामांचा विचार करण्यासाठी अनिल काकोडकर यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती स्थापन केली आहे. म्हणजे जी गोष्ट डेटा सेंटर्सबाबत कोणताही निर्णय घेण्याअगोदर करायला हवी होती ती आता सगळे करारमदार झाल्यावर आणि कंपन्यांना हमी दिल्यावर झाली आहे. काकोडकर समितीत बाकी सगळे प्रशासकीय अधिकारी आहेत. त्यामुळे ही समिती सरकारच्या धोरणाला अनुकूल असाच निर्णय देईल. पण समजा काकोडकर यांनी डेटा सेंटर म ुंबईत नकोत अशी शिफारस केली तर सरकार त्यांचे ऐकणार आहे काय असा प्रश्न आहे. शिवाय काकोडकर ज्या दुसऱ्या अटी वगैरे घालतील त्या कंपन्यांना कशा बंधनकारक केल्या जाऊ शकतील असाही मुद्दा आहेच. आधी कळस मग पाया या रीतीने आधी निर्णय मग विचार याची आणखी डझनावारी उदाहरणे देता येतील. रिक्षा व टॅक्सीवाल्यांना मराठीसक्तीचा निर्णय व त्याची माघार ही फार जुनी गोष्ट नाही. असले कितीही उफराटे कारभार केले तरी त्या सरकारला आणि त्याचे नेते म्हणून मोदी व फडणवीसांना चांगले कारभारी म्हणून ओळखले जाते, याहून मोठे दुर्दैव काय असेल?

## विचार

# आणखी एका पक्षाचे राज्य खालसा

***पश्चिम बंगालमध्ये ममता बॅनर्जी यांचा पराभव झाला, पक्ष दुभंगला, खासदार आमदार फुटले. आता तर त्यांनी नंदिग्राम पोटनिवडणुकीसाठी जाहीर केलेला उमेदवार मागे हटला आणि रेझीनगर मतदारसंघातील उमेदवारही गडबडला. सहा ऑक्टोबरला होणाऱ्या या निवडणुकीच्या निमित्ताने ममता यांनी काँग्रेसच्या उमेदवाराला पाठिंबा जाहीर केला आहे. पश्चिम बंगालमध्ये वेगाने पालटत असलेल्या राजकीय वातावरणाचा खास वेध.***



**डॉ. सुकृत खांडेकर**

देशामध्ये काही राज्यांमध्ये विरोधकांची सत्ता उलथवल्यानंतर त्यांचे पक्षही खालसा केले गेले. या यादीमध्ये आता ममता बॅनर्जी यांच्या तृणमूल काँग्रेसचेही नाव समाविष्ट झाले आहे. ममता बॅनर्जी यांच्या तृणमूल काँग्रेसच्या तिकीटावर निवडून आलेल्या ऐंशीपैकी अठ्ठावन्न आमदारांनी आणि लोकसभेतील बावीसपैकी तेरा खासदारांनी बंड पुकारले. विधानसभेतील आमदारांच्या गटाला अध्यक्षांनी तत्काळ मान्यता दिली आणि लोकसभेतील खासदार हे कोणालाही ठाऊक नसलेल्या एका पक्षात सामील झाले. महाराष्ट्रासारखा तोडफोडीचा प्रयोग पश्चिम बंगालमध्ये झाला. महाराष्ट्रात उद्धव ठाकरे आणि शरद पवार यांना खच्ची करण्यासाठी त्यांच्या पक्षांमध्ये बंडाचे झेंडे फडकले किंवा फडकवले गेले. पश्चिम बंगालमध्ये ममता बॅनर्जींना शक्तिहीन करण्यासाठी त्यांच्या पक्षावर प्रहार झाले. शिवसेना, राष्ट्रवादी काँग्रेस आणि तृणमूल काँग्रेसमध्ये झालेल्या बंडखोरीच्या पटकथा थोड्याफार फरकाने सारख्याच होत्या. नेतृत्वावर अविश्वास दाखवून पक्षातून बाहेर पडायचे, नंतर मूळ पक्षावरच दावा सांगायचा, आमदार-खासदारांच्या संख्याबळावर विधानसभेत आणि निवडणूक आयोगाकडून बंडखोरांनी मान्यता मिळवायची आणि पक्षाचे अधिकृत चिन्हही प्राप्त करून विजय मिळवला म्हणून दंड थोपटायचे, असे देशात सतत घडत आहे. निवडणूक आयोग ही स्वायत्त आणि घटनात्मक संस्था आहे. तिच्या निर्णय प्रकियेत कुणाला ढवळाढवळ करता येत नाही. न्यायालयात दाद मागितली तर वर्षानुर्षे काहीच घडत नाही. अशा वेळी जे पक्ष फुटले किंवा फोडले गेले, त्यांची अवस्था केविलवाणी होते. त्यांचे नेते हतबल होतात. मी काही देऊ शकत नाही किंवा मी काही करू शकत नाही, असे सांगण्याची त्यांच्यावर वेळ येते.

ममता बॅनर्जी यांनी स्थापन केलेल्या पक्षाचे नाव आणि निवडणूक चिन्हच निवडणूक आयोगाने गोठवले. पोटनिवडणुकीसाठी ममता अखिल भारतीय तृणमूल काँग्रेस हे नाव आणि फूटबॉलपटू हे चिन्ह दिले. बंडखोर गटाला लोकशाहीवादी तृणमूल काँग्रेस हे नाव आणि लिफाफा हे चिन्ह दिले. निवडणूक आयोगाने ममता यांनी जन्म दिलेल्या तृणमूल काँग्रेसचे नाव एका फटकाऱ्यात गोठवून टाकले. याचा सर्वात जास्त आनंद कुणाला झाला असेल हे वेगळे सांगण्याची गरज नाही. महाराष्ट्रात ठाकरेंनी स्थापन केलेली शिवसेना आणि पवारांनी स्थापन केलेली राष्ट्रवादी काँग्रेस कमजोर झाल्यावर कुणाला लाभ झाला हे सर्व महाराष्ट्र अनुभवतो आहे. तसेच पश्चिम बंगालमध्ये तृणमूल काँग्रेसचे विभाजन झाल्यावर ज्यांना बंगाल काबीज करायचा होता, त्यांचा मोठा प्रतिस्पर्धी दुर्बल झाला. शिवसेना फोडल्याचे बक्षिस म्हणून एकनाथ शिंदे यांना अडिच वर्षे मुख्यमंत्रीपद मिळाले आणि आता ते उपमुख्यमंत्री आहेत. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षामधून बाहेर पडले म्हणून अगोदर अजितदादा पवारांना उपमुख्यमंत्रीपद मिळाले आणि त्यांच्या निधनानंतर राजकीय वारस म्हणून सुनेत्रावहिंनीना हेच पद देण्यात आले. त्याच सुत्राने ममता यांचे तृणमूल काँग्रेससमधील एकेकाळचे निकटवर्तीय सुवेंधू अधिकारी यांना पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्रीपदाच्या खुर्चीवर बसवण्यात आले. महाराष्ट्रात किंवा पश्चिम बंगालमध्ये जनमत आणि संख्याबळ भाजपाच्या पाठिशी आहे. त्यापुढे उद्धव ठाकरे, शरद पवार किंवा ममता बॅनर्जी यांना पुन्हा संघटना उभारून भाजपाला आव्हान देणे आज तरी खूप कठीण दिसते.

एक लढाऊ आणि आक्रमक नेत्या म्हणून ममता बॅनर्जी यांची देशभरात ओळख आहे. बंगालची वाघीण म्हणून त्यांचा देशभर मिडियातून उल्लेख केला जायचा. याच वाघिणीने अठ्ठावीस वर्षे सत्तेवर असलेल्या डाव्या आघाडीला हटवले. त्याच ममता यांचे सलग पंधरा वर्षे सत्तेवर असलेले सरकार भाजपाने साम, दाम, दंड, भेद असे सारे मार्ग अवलंबून सत्तेवरून हटवले. विधानसभा निवडणुकीमध्ये सुवेंधू अधिकारी यांनी त्यांचा पंधरा हजार मतांनी पराभव केला. त्याचे बक्षिस म्हणून भाजपाने त्यांना मुख्यमंत्रीपदी बसवले. पक्षाची सत्ता गेली, ममता यांचाच पराभव झाला, पक्ष दुभंगला, खासदार-आमदार फुटले. बंडखोरांनी तृणमूल काँग्रेस पक्षावर दावा सांगितला. ममता यांनी नंदिग्राम विधानसभा पोटनिवडणुकीत जाहीर केलेल्या उमेदवार थेट मुख्यमंत्र्यांना भेटल्या आणि आपण निवडणूक लढणार नसल्याचे जाहीर केले. रेझीनगर मतदारसंघातील पोटनिवडणुकीतील ममता यांचा उमेदवार पक्षाचे पाने व गवत हे निवडणूक चिन्ह आयोगाने गोठवले म्हणून हबकला. नव्या चिन्हावर कसे निवडून येणार अशी त्याला भीती वाटू लागली. तो सकाळी म्हणाला, मी निवडणूक लढवणार नाही, दुपारी ममता यांना भेटल्यावर तो निवडणूक लढवायला तयार झाला, तर आता तो द्विधा मन:स्थितीत मैदानात आहे. असा उमेदवार लढत तरी काय देऊ शकणार? येत्या सहा ऑक्टोबरला निवडणूक आहे. नऊ ऑक्टोबरला निकाल आहे. स्वत: ममता यांची भाजपाशी राजकीय आणि निवडणूक आयोगाशी कायदेशीर लढण्याची तयारी आहे. पण उमेदवारच पळ काढणार असतील तर त्या काय करणार?

नंदिग्राममधून आपल्या उमेदवाराने मुख्यमंत्र्यांना भेटून मैदानातून पळ काढल्यावर ममता यांनी काँग्रेसच्या उमेदवाराला पाठिंबा जाहीर केला. ममता अगोदर काँग्रेसमध्येच होत्या. भाजपाच्या विरोधातील इंडिया आघाडी बळकट झाली पाहीजे, असे त्या सतत सांगत आहेत. त्यामुळे नंदिग्राममधे काँग्रेसला पाठिंबा देण्यावाचून त्यांच्यापुढे पर्याय तरी काय होता? पण त्यांनी पाठिंबा जाहीर करताच काही वेळातच काँग्रेसच्या उमेदवाराला २००७ मध्ये नंदिग्राम आंदोलनात झालेल्या एका हत्या प्रकरणात पोलिसांनी लगेच अटक केली. त्याला अटक करण्याची तत्परता १९ वर्षांनी दाखवली गेली. ताज्या घडामोडींनंतर काँग्रेस पक्ष आणि राहुल गांधी हे ममता यांच्या पाठिशी उभे आहेत, हे अवघ्या देशाला दिसून आले. निवडणूक आयोगाने त्यांच्या पक्षाचे नाव, चिन्ह गोठवल्यावर राहुल गांधी यांनी अगोदर शिवसेना, नंतर राष्ट्रवादी काँग्रेस आणि आता तृणमूल काँग्रेसवर तोच प्रयोग सुरु असल्याचे 'एक्स'वर म्हटले आहे. ममता यांची सार्वजनिक कारकिर्द काँग्रेस पक्षातूनच सुरू झाली. आता पुन्हा २९ वर्षांनी त्या पुन्हा काँग्रेसच्या जवळ येत आहेत. कोलकत्यात कॉलेजमध्ये शिकत असताना त्या विद्यार्थी संघटनेत काम करायच्या. डाव्या पक्षांना विरोध करायच्या. आणिबाणीनंतर त्यांनी कोलकत्याच्या रस्त्यावर तत्कालीन पंतप्रधान मोरारजी देसाई यांना काळे झेंडे दाखवण्याचे धाडस केले होते. तेव्हापासून त्यांचे नाव राजकारणात झळकू लागले. १९८४ मधे त्यांनी मार्क्सवादी पक्षाचे दिग्गज नेते सोमनाथ चटर्जी यांचा लोकसभा निवडणुकीत पराभव केला तेव्हा त्यांचा जायंट किलर म्हणून उल्लेख झाला होता. ममतादीदींनी १९९३ मध्ये सरकारचे प्रशासकीय मुख्यालय असलेल्या रायटर्स बिल्डिंगवर युवक काँग्रेसचा विराट धडक मोर्चा काढला तेव्हा पोलिसांनी केलेल्या गोळीबारात तेराजण मृत्युमुखी पडले. तेव्हापासून ममता यांच्या नेतृत्वाखाली बंगालमध्ये दरवर्षी शहिद दिन पाळायला सुरूवात झाली. काँग्रेस पक्ष डाव्या आघाडीविरोधात आक्रमकपणे लढत नाही म्हणून त्यांनी १९९८ मध्ये तृणमूल काँग्रेसची स्थापना केली. वाजपेयी सरकारम ध्ये त्या केंद्रीय मंत्री होत्या. २०११, २०१६ आणि २०२१ अशा तिनही विधानसभा निवडणुकीमध्ये राज्यात तृणमल काँग्रेसची सत्ता आली. पण २०२६ मध्ये भाजपाने सर्व ताकद पणाला लावून त्यांना हटवण्यात यश मिळवले. भाजपाच्या रणनितीपुढे ममता एकाकी पडत आहेत. 'आपल्या पक्षाचे नाव आणि चिन्ह गोठवण्याचा आयोगाचा निर्णय पक्षपाती, घटनाबाह्य आणि बेकायदेशीर असून आपण या निर्णयाशी असहमत आहोत, असे ममता यांनी म्हटले आहे. भाजपा विरोधातील लढाईसाठी त्यांना आता काँग्रेसचाच आधार आहे.

## चर्चा आजची

# अबब! पाणी बिलाची एवढी उधारी?



**राकेश लोहार**

कृषीवलमध्ये प्रसिद्ध झालेल्या बातमीची शुक्रवारी दिवसभर जिल्हाभरात जोरदार चर्चा रंगल्याचे दिसून आले. एवढी थकबाकी राहूच कशी शकते? आम्ही तर आमचे पैसे वेळेवर भरतो, मग...? सांगायचा मुद्दा हाच की, आज कोट्यवधींचा अर्थसंकल्प मांडणाऱ्या रायगड जिल्हा परिषदेकडे एमआयडीसीचे तब्बल १३९ कोटी २७ लाख रुपयांचे पाणीबिल द्यायला पैसे नसल्याने ते थकल्याची गंभीर बाब आज सर्वांसमोर येणे, ही धक्कादायक बाब आहे.

गावागावांतून जनतेकडून पाणीपट्टी वसूल केली जाते, मग हा पैसा जातो कुठे? सामान्य नागरिकाने पाणीपट्टी भरली नाही, तर त्याच्यावर कारवाईचा बडगा उगारला जातो; मग कोट्यवधींची थकबाकी ठेवणाऱ्या यंत्रणांना कोण जाब विचारणार? चेंढरे, नागोठणे, रेवससह अनेक गावांच्या पाणीपुरवठा योजनांची कोट्यवधींची बिले थकीत असताना प्रशासन नेमके करत काय होते? एमआयडीसीने थकबाकी न भरल्यास पाणीपुरवठा कमी करण्याचा आणि नळजोडण्या खंडित करण्याचा इशारा दिला आहे. त्यामुळे अधिकाऱ्यांच्या आर्थिक नियोजनातील दिरंगाईची शिक्षा सामान्य जनतेने पाण्याविना राहून भोगायची का, हाच खरा गंभीर प्रश्न सर्वसामान्यांनी विचारला तर त्या वावगे काय? जिल्हा परिषदेकडून यंदा केवळ २० लाख रुपये अदा केल्याची माहिती आहे. असे असताना १३९ कोटींच्या थकबाकीचा डोंगर कसा फेडणार, हा प्रश्नही अनुत्तरित आहे. ग्रामपंचायतींकडून किती पाणीपट्टी वसूल झाली, किती थकीत आहे आणि जमा झालेल्या पैशांचा विनियोग कुठे झाला, याचा स्पष्ट हिशेब जनतेसमोर आलाच पाहिजे. थकबाकी वाढेपर्यंत प्रशासन झोपले होते का?

आता पाणीपुरवठा खंडित होण्याची वेळ आली, तरच जाग येणार का? असा संतप्त सवाल जिल्हा परिषद प्रशासनाला सामान्य जनतेकडून विचारला जाऊ शकतो. जिल्हा परिषद प्रशासनाला एक सवाल करायचा आहे, तो म्हणजे जर जनतेकडून कर वसूल करण्यात तत्परता दाखवता, मग देणी चुकती करताना हात आखडता का? जनतेच्या पैशांचा हिशेब देणे ही उपकाराची बाब नाही, तर प्रशासनाची जबाबदारी आहे. त्यामुळे केवळ खुलासे नकोत; थकबाकीचा ग्रामपंचायतनिहाय तपशील, वसुलीचे नियोजन आणि दोषींवर जबाबदारी निश्चित करण्याची ठोस कार्यवाही जाहीर करा. अन्यथा, कोट्यवधींच्या थकबाकीचा हा प्रश्न केवळ आर्थिक अनागोंदीचा न राहता ग्रामीण जनतेच्या पाण्याच्या हक्कावर गदा आणणारा ठरेल.

विशेष म्हणजे, हा प्रश्न केवळ एमआयडीसी आणि जिल्हा परिषदेपुरता मर्यादित नाही, तर रायगडच्या ग्रामीण जनतेच्या भविष्याशी जोडलेला आहे. आज पाणीबिल थकीत आहे, उद्या पाणीपुरवठा खंडित झाला तर त्याची झळ हजारो कुटुंबांना बसणार आहे. गावागावांत पाण्यासाठी नागरिकांना धावपळ करावी लागली, तर त्याला जबाबदार कोण? प्रशासनातील आर्थिक व्यवहारांचा फटका सर्वसामान्यांच्या दैनंदिन जीवनाला बसणार असेल, तर संबंधित यंत्रणांच्या कार्यपद्धतीचा जाब विचारलाच पाहिजे.

रायगड जिल्हा परिषद ही ग्रामीण भागाच्या विकासाची जबाबदारी असलेली संस्था आहे. त्यामुळे पाणीपुरवठ्यासारख्या मूलभूत सुविधेच्या बाबतीत आर्थिक नियोजनाचा अभाव खपवून घेता कामा नये. थकबाकीचा आकडा एवढा मोठा होईपर्यंत त्यावर प्रभावी उपाययोजना का झाल्या नाहीत, याची चौकशी झाली पाहिजे. केवळ ग्रामपंचायतींकडून वसुली थकीत असल्याचे सांगून जबाबदारी झटकता येणार नाही. प्रत्येक योजनेची आर्थिक स्थिती, जमा झालेली रक्कम आणि संबंधित देयकांची माहिती जनतेसमोर मांडली पाहिजे.

आज कृषीवलने या गंभीर प्रश्नाकडे लक्ष वेधले आहे. आता जिल्हा परिषद प्रशासन याची किती गांभीर्याने दखल घेते, हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे. जनतेच्या पैशांचा विनियोग पारदर्शकपणे झाला पाहिजे आणि पाणीपुरवठा सुरळीत ठेवण्यासाठी तातडीने उपाययोजना झाल्या पाहिजेत. कोट्यवधींची थकबाकी असताना प्रशासनाने केवळ पत्रव्यवहार आणि खुलाशांमध्ये वेळ घालवू नये. प्रत्यक्ष कृतीतून आपली जबाबदारी सिद्ध करावी.

पाणी हा कोणत्याही राजकारणाचा किंवा प्रशासकीय दिरंगाईचा विषय नसून नागरिकांच्या जगण्याचा प्रश्न आहे. त्यामुळे आता तरी प्रशासनाने जागे व्हावे, थकबाकीचा प्रश्न मार्गी लावावा आणि जनतेचा पाणीपुरवठा सुरक्षित ठेवण्यासाठी ठोस पावले उचलावीत. कारण, ऑक्टोबर हिटच्या चटक्यांनी आधीच जगणेच मुश्किल झालेला माणसाला पाण्याअभावी दुष्काळाच्या झळा बसू देऊ नका, एवढीच जिल्हा परिषद प्रशासनला विनंती असेल.

## लोकसंसद

### ट्रम्प यांचा दुटप्पीपणा

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांचे भारतावर रशियाकडून खनिज तेल खरेदी बंद करण्यासाठी दबाव टाकण्याचे धोरण म्हणजे आंतरराष्ट्रीय राजकारणातील दुटप्पीपणाचे उत्तम उदाहरण आहे. भारताने रशियाकडून तेल खरेदी करू नये, कारण त्यातून मिळणारा पैसा युक्रेनविरुद्धच्या युद्धासाठी रशियाला उपयोगी पडतो, असा युक्तिवाद ट्रम्प करतात. मात्र, दुसरीकडे अमेरिका स्वतः रशियाकडून डिझेलसारख्या पेट्रोलियम उत्पादनांची खरेदी करत असेल, तर ट्रम्प यांच्या भूमिकेतील विरोधाभास स्पष्ट होतो. भारत हा स्वतंत्र आणि सार्वभौम देश आहे. आपल्या ऊर्जेच्या गरजा, आर्थिक हितसंबंध आणि देशातील जनतेच्या हिताचा विचार करून निर्णय घेण्याचा भारताला पूर्ण अधिकार आहे. भारत जगातील मोठ्या तेल आयातदार देशांपैकी एक आहे. रशियाकडून तुलनेने स्वस्त दरात तेल उपलब्ध होत असल्यास भारताने त्याचा विचार करणे स्वाभाविक आहे. कारण तेलाच्या किमती वाढल्या तर त्याचा परिणाम देशातील महागाईवर, वाहतूक खर्चावर आणि सर्वसामान्य नागरिकांच्या खिशावर होतो. अमेरिका स्वतःच्या आर्थिक फायद्यासाठी रशियाशी व्यापार करू शकते, पण भारताने मात्र रशियाकडून तेल खरेदी करू नये, असा आग्रह धरणे कितपत योग्य आहे? भारताचे रशियाशी दीर्घकालीन संबंध आहेत, तसेच अमेरिकेशीही भारताचे महत्त्वाचे व्यापारी आणि सामरिक संबंध आहेत. या दोन्ही संबंधांचा समतोल राखताना भारताने कोणत्याही देशाच्या दबावाखाली न येता स्वतंत्र परराष्ट्र धोरण राबवले पाहिजे. भारताने अमेरिकेशी संघर्ष करण्याची गरज नाही; मात्र देशाच्या हिताच्या बाबतीत ठाम राहणे आवश्यक आहे. ट्रम्प यांनी भारताला उपदेश करण्यापूर्वी स्वतःच्या देशाच्या व्यापारधोरणाकडे पाहावे

**– श्याम ठाणेदार, दौंड जिल्हा पुणे**

## दिनविशेष

# वाचन प्रेरणा दिन

आज १५ ऑक्टोबर भारताचे माजी राष्ट्रपती मिसाईल मॅन डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांचा जन्मदिवस. वाचन आणि लेखन आवडणारे भारताचे माजी राष्ट्रपती डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांच्या स्मरणार्थ आजचा दिवस संपूर्ण देशात वाचन प्रेरणा दिन म्हणून साजरा केला जातो. देशातील प्रत्येक व्यक्ती सकारात्मक विचार करून स्वतः ला समृद्ध कसा करेल आणि त्यायोगे देश महासत्ता कसा बनेल, असाच विचार माजी राष्ट्रपती डॉ. अब्दुल कलाम करत असत. अब्दुल कलाम यांनी १९९६ साली इंडिया २०२० हे पुस्तक लिहिले. याच पुस्तकाच्या आधारे तेंव्हाच्या नियोजन आयोगाने व्हिजन २०२० तयार केले. डॉ अब्दुल कलाम यांनी अग्निपंख नावाने आत्मचरित्र लिहिले. त्यात त्यांनी बालपणापासून राष्ट्रपती बनण्यापर्यंतच्या प्रवासाचे वर्णन केले आहे. डॉ. अब्दुल कलाम यांनी एकूण २४ पुस्तके लिहिली असून त्यातील बहुतांशी पुस्तके विद्यार्थी आणि शिक्षकांसाठीच लिहीली आहेत. विद्यार्थ्यांनी जास्तीतजास्त पुस्तके वाचून स्वतःचे ज्ञान दृढ करावे, असा त्यांचा आग्रह होता. वाचनानेच माणूस समृद्ध बनतो, असे त्यांचे मत होते. त्यासाठी लहान वयातच मुलांमध्ये वाचनाची आवड निर्माण करावी असे ते नेहमी म्हणत. साहित्य संमेलनामध्ये पुस्तकांची विक्री कमी होऊ लागली आहे. आजची पिढी सोशल मीडियाच्या आहारी गेल्याने पुस्तकांपासून दूर होत चालली आहे. सोशल मीडियाच्या आक्रमणामुळे विद्यार्थी अवांतर वाचन विसरून चालले आहेत. सोशल मीडियामुळे वाचन संस्कृती लोप पावत चालली आहे. वाचन संस्कृती टिकवण्यासाठी आणि विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची आवड निर्माण करण्यासाठी शाळा महाविद्यालयात हा दिवस साजरा केला जातो. या दिवशी शाळा महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना वाचनासाठी पुस्तके दिली जातात. वाचलेल्या पुस्तकांवर चर्चा केली जाते. आजच्या दिवशी शाळा महाविद्यालयात तसेच सरकारी आस्थापनात विविध कार्यक्रम, चर्चासत्रे, प्रशिक्षणे आयोजित केली जातात. वाचन संस्कृती जोपासण्यासाठी सर्वांनी आपल्या मित्रांना, नातेवाईकांना एक पुस्तक पुस्तके भेट द्यावे. आजच्या दिवशी प्रत्येकाने किमान एक पुस्तक वाचावे. वाचन प्रेरणा दिन हा एक स्तुत्य उपक्रम आहे. आजच्या युगात ज्ञान ही खूप मोठी शक्ती आहे, याचाच आपल्याला विसर पडला आहे. वाचनामुळे आपल्याला इतिहासाचे ज्ञान, वर्तमानाचे भान आणि भविष्याचा वेध घेता येतो. ज्ञान मिळवण्याचे सर्वात प्रभावी माध्यम म्हणजे वाचन. सातत्याने वाचन केल्याने आपली ग्रहण क्षमता आणि स्मरणशक्ती अधिकाधिक सशक्त होऊन बुद्धिमत्ता अधिकाधिक प्रगल्भ होते. त्यातून माणसाच्या विचार पातळीचा चोहोबाजूंनी विकास होतो. वाचनामुळेच माणसाच्या व्यक्तिमत्त्वाची जडणघडण होते. वाचनामुळे माणूस सुसंस्कृत होतो. वाचन ही जीवनाला उन्नत करणारी बाब आहे. यामुळे बुद्धीची मशागत होते. माणसाचे जीवन फुलवण्यात वाचनाचा मोठा वाटा असतो. त्यामुळे वाचनाचा छंद जोपासून आपले जीवन समृद्ध करायला हवे. मनावरचा ताण कमी करण्यासाठी पुस्तकांच्या सहवासात रमले पाहिजे. चांगल्या पुस्तकांचा, विचारांचा आपल्या जीवनावर सकारात्मक परिणाम होतो आणि आयुष्याकडे पाहण्याचा आपला दृष्टकोन कायमचा बदलतो. ऐतिहासिक पुस्तकांमुळे वाचकांच्या मनात राष्ट्रनिष्ठा निर्माण होते. कथा-कादंबरी वाचनाने वाचकांच्या मनात माणुसकीचा भाव जागृत होतो. काव्य वाचनातून आपल्या मनात संवेदनशीलता निर्माण होते. थोरांची चरित्रे वाचून प्रेरणा मिळते. वर्तमानपत्रे वाचल्याने सामाजिक जाणिव निर्माण होते. पुस्तकांमुळे कमकुवत मनाला धीर मिळतो. त्यामुळे निराशेच्या गर्ते त अडकलेला माणूस हत्या, आत्महत्या करण्यापासून परावृत्त होतो. आजकालच्या मुलांना खूप ताण असतो. हा ताण कमी करण्याचे प्रभावी मध्यम म्हणजे वाचन. आज वाचनाअभावी समाजातील नैतिक मूल्ये हरवत चालली आहेत. त्यामुळे नव्या पिढीने पुन्हा एकदा वाचन संस्कृतीकडे वळणे ही काळाची गरज आहे. आपल्या आणि समाजच्या भल्यासाठी वाचन संस्कृती टिकवायलाच हवी. वाचल तर वाचाल या उक्तीप्रमाणे तरुण पिढीला वाचवायचे असेल तर त्यांच्यात वाचन संस्कृती रुजवायलाच हवी. त्यासाठी वाचन प्रेरणा दिन यासारखे उपक्रम नक्कीच उपयोगी ठरेल.

**– श्याम ठाणेदार**

# मुख्याधिकाऱ्यांची एकाधिकारशाही

**● सभागृहाला न विचारता रस्त्याच्या दुरुस्तीची कामे ● निविदा प्रक्रिया रद्द करण्याची विरोधी पक्षाची मागणी**

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

माथेरान शहरातील रस्ते दगड मातीपासून बनवण्याची पद्धत आह. हे दगड मातीचे रस्ते टिकवू नसतात. त्यामुळे जेएसबी मटेरियल वापरून रस्ते करण्याची मागणी पालिकेतील लोकप्रतिनिधी यांनी घेतली होती. मात्र पालिका मुख्याधिकारी यांनी मनमानीपणे निर्णय घेत पालिका सभागृहाची परवानगी न घेता डब्लूबीएमचा वापर करून रस्ता दुरूस्तीची कामे करावी, यासाठी सात रस्त्यांची कामे करण्याच्या निविदा काढल्या आहेत. दरम्यान या सर्व निविदा रद्द करण्यात याव्यात आणि पुढील वर्षी त्या सर्व रस्त्यांची कामे हाती घ्यावीत, अशी मागणी पालिकेतील विरोधी पक्षाने निवेदनाव्दारे केली आहे.



माथेरानमधील भौगोलिक परिस्थिती, अतिवृष्टी, रस्त्यांवरील पाण्याचा निचरा आणि प्रतिकूल हवामान या सर्व बाबी लक्षात घेता, या रस्त्यांची कामे सध्याच्या परिस्थितीत पुढे नेण्याऐवजी निविदा प्रक्रियेचा पुनर्विचार करणे आवश्यक आहे. निविदा प्रक्रिया, निविदा फॉर्म फी, रस्त्यांच्या कामाच्या प्रकाराबाबत खुलासा, कामांच्या कालावधीबाबत योग्य निर्णय घेणे तसेच रस्ते दुरुस्तीसाठी काढण्यात आलेली निविदा तात्काळ स्थगित करून जून महिन्यात नव्याने निविदा काढण्यात यावी, अशी मागणी विरोधी पक्षनेते सीताराम कुंभार यांनी लेखी निवेदनाद्वारे मुख्याधिकारी राहुल इंगळे यांच्याकडे केली आहे. यावेळी नगरसेवक सचिन दाभेकर उपस्थित होते.

निवेदनात नमूद केले आहे की, पालिकेतील कोणत्याही लोकप्रतिनिधीला विश्वासात न घेता किंवा संबंधित सभागृहाची आवश्यक मंजुरी न घेता अशा प्रकारचे निर्णय घेणे कितपत योग्य आहे? या निर्णयामागील प्रशासकीय प्रक्रिया नेमकी काय आहे. दुसरी महत्त्वाची बाब म्हणजे सभागृहामध्ये रस्त्यांची कामे जेएसबी पद्धतीने करण्याबाबत चर्चा होऊन तसा ठराव करण्याची भूमिका मांडण्यात आली होती. मात्र प्रत्यक्ष निविदेमध्ये डब्ल्यूबीएम स्वरूपातील रस्ते दुरुस्तीची कामे कशी समाविष्ट करण्यात आली? सभागृहात झालेली चर्चा, मंजूर ठराव आणि प्रत्यक्ष निविदेतील कामाचे स्वरूप यामध्ये हा फरक कसा निर्माण झाला आहे. या निविदा प्रक्रिया तात्काळ स्थगित करण्यात यावी आणि रस्त्यांच्या कामांचे योग्य तांत्रिक नियोजन करून पुढील वर्षी जून महिन्यात नव्याने निविदा काढण्यात यावी, ही आमची ठाम मागणी आहे. तसेच, निविदा फॉर्म फी पाच हजार ठेवणे, सभागृहातील निर्णय आणि प्रत्यक्ष निविदेतील कामाच्या स्वरूपामध्ये दिसणारी तफावत, तसेच कामे करण्याच्या कालावधीबाबत असलेली अस्पष्टता या सर्व बाबी पाहता, निविदा प्रक्रिया आणि कामांच्या नियोजनामध्ये पारदर्शकता असणे आवश्यक आहे. एकंदरीत सभागृहात सुरू असलेल्या या भोंगळ कारभाराबाबतीत जिल्हाधिकारी रायगड, कोकण आयुक्त मुंबई, नगराध्यक्ष यांनाही निवेदन सादर करण्यात आले आहे.

## अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे

**१५ ऑक्टोबर**

१) श्री.गोविंद दत्तात्रेय नाईक विद्यानगर-अलिबाग, दि.१५-१०-१९४२
२) श्री.सुधाकर जनार्धन म्हात्रे मु.अलिबाग, दि.१५-१०-१९४५
३) श्री.हरिश्चंद्र शंकर मगर मु.वेश्वी, अलिबाग, दि.१५-१०-१९५०
४)श्री.(डॉ.)भालचंद्र किसन लोंढे बायपास रोड, अलिबाग दि.१५-१०-५१
५)श्री.प्रभाकर गोविंद पाटील चेंढरे-अलिबाग, दि.१५-१०-१९४४
६)श्री.(डॉ.)प्रमोद रामराव कुमठेकर दि.१५-१०-१९५६

## कृषीवलच्या वाचकांना आवाहन




अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे.जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.

**संपर्क-** ८०५५३२५६७८ **(बीपीन राठवा)**
९२२६०५५१५५ **(अमित शहानंद)**
**- मुख्य संपादक,कृषीवल**

**आजचे अन्नदाते**



**कै. नाना ठाकुर सर, स्मृती प्रित्यर्थ, कोपर, अलिबाग**

# जलसाठ्याचे नियोजनबद्ध व्यवस्थापन करा

**■ रायगड पाटबंधारे विभागाकडून सर्व प्रशासनांना आवाहन**

**। रोहा । प्रतिनिधी ।**

अल निनोच्या प्रभावामुळे या वर्षी पर्जन्यमानात घट झाल्याने २६५ तालुक्यांमध्ये दुष्काळ जाहीर केला आहे. अल निनोचा प्रभाव पुढील वर्षापर्यंत राहणार आहे. त्यामुळे ३१ ऑगस्ट २०२७ पर्यंत जलसाठ्याचे काटकसरीने व अत्यंत नियोजनबद्ध पद्धतीने व्यवस्थापन करणे आवश्यक असल्याचे आवाहन कोलाड येथील रायगड जिल्हा पाटबंधारे विभागाचे उप कार्यकारी अधिकारी अतुल आगवणे यांनी रायगड जिल्ह्यातील सर्व नगरपरिषद, नगर पंचायत व ग्रामपंचायतींना लेखी पत्राद्वारे केले आहे.

राज्यातील प्रमुख धरणे, जलाशय, तलाव व इतर जलस्त्रोतांमध्ये उपलब्ध असलेला जलसाठा मर्यादीत असल्याने त्याचा विविध उपयोगांसाठी काळजीपूर्वक व विशिष्ठ प्राधान्यक्रमाने करणे आवश्यक आहे. संभाव्य दुष्काळसदृश परिस्थितीत पिण्याच्या पाण्याची उपलब्धता अबाधित ठेवणेसाठी शासनाने दि.१६ ऑक्टोबरपासून सर्व महानगर पालिका, नगर पालिका, नगर पंचायत व ग्रामपंचायतींना किमान १० टक्के पाणी कपात लागू करण्याचे निर्देश दिले आहेत.

या परिस्थितीचा विचार करता रायगड जिल्ह्यातील उपलब्ध जलसाठ्याचे काटेकोर व नियोजनबद्ध पद्धतीने व्यवस्थापन करण्याच्या अनुषंगाने आपल्या कार्य क्षेत्रातील पाणी पुरवठा व्यवस्था व उपलब्ध पाणीसाठा विचारात घेऊन उपलब्ध पाणीसाठा, अपेक्षित पाण्याची मागणी व आगामी कालावधीतील संभाव्य पाणी टंचाईचा आढावा घ्यावा. तसेच, शासनाच्या लागू निर्देशानुसार दि.१६ ऑक्टोबरपासून किमान १० टक्के पाणी कपात लागू करण्याबाबत आवश्यक कार्यवाही करावी, असे आवाहन पाट बंधारे विभागाकडून करण्यात आले आहे.



# तटकरे तंत्रनिकेतनमध्ये नवरात्रौत्सवाचा उत्साह

**। कोलाड । प्रतिनिधी ।**

विद्येची देवता आणि ज्ञान, कला व संस्कारांची अधिष्ठात्री देवीच्या आगमनाने श्रीमती गीता द. तटकरे तंत्रनिकेतनमध्ये भक्तिमय वातावरण निर्माण झाले आहे. आकर्षक फुलांची सजावट, सुंदर रंगसंगती आणि पारंपरिक पद्धतीने सजविण्यात आलेला देवीचा दरबार सर्वांचे लक्ष वेधून घेत आहे. महाविद्यालयात नवरात्रोत्सवानिमित्त नऊ दिवस विविध विभागांना देवीच्या आरतीचा मान देण्यात आला आहे. या उपक्रमातून विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीसोबतच त्यांच्यामध्ये ज्ञान, कला, संस्कार आणि सकारात्मक विचारांची जोपासना व्हावी, अशी भावना व्यक्त केली जात आहे. तटकरे चॅरिटेबल ट्रस्टचे विश्वस्त संदीप तटकरे यांच्या मार्गदर्शनाखाली नवरात्रोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे.

# पिंक रिक्षा योजना कागदावरच?

**■ स्थानिक महिला रिक्षाचालकांना अनुदानाची प्रतीक्षा कायम**
**■ प्रशासनाचे दुर्लक्ष**

**। श्रीवर्धन । प्रतिनिधी ।**

महाराष्ट्र राज्य शासनाने महिलांना सक्षम बनवण्यासाठी आणि त्यांना स्वयंरोजगाराची संधी उपलब्ध करून देण्यासाठी सुरु केलेली पिंक रिक्षा योजना श्रीवर्धन तालुक्यात मात्र अद्याप कागदावरच असल्याचे चित्र आहे. स्थानिक महिला रिक्षाचालक अजूनही या योजनेच्या लाभापासून वंचित असून, प्रशासनाच्या या दुर्लक्षामुळे महिला रिक्षा चालकांमध्ये नाराजी व्यक्त केली जात आहे.



श्रीवर्धन तालुक्यात अनेक महिला संसार चालवण्यासाठी किंवा कुटुंबाला हातभार लावण्यासाठी रिक्षा चालवण्याचा व्यवसाय करतात. शासनाने जाहीर केलेल्या योजनेनुसार महिलांना पिंक रिक्षा खरेदीसाठी अनुदान व बँक कर्ज उपलब्ध करून दिले जाणार होते. या योजनेमुळे महिलांना आर्थिक स्थैर्य मिळेल, अशी आशा निर्माण झाली होती. परंतु, प्रत्यक्ष अंमलबजावणीतील त्रुटी आणि शासकीय माहितीचा अभाव यांमुळे तालुक्यातील एकाही महिलेला आतापर्यंत या योजनेचा प्रत्यक्ष लाभ मिळालेला नाही. तालुक्यातील महिलांना या योजनेत प्राधान्य देऊन तात्काळ अर्ज प्रक्रिया सोपी करावी आणि अनुदानाची रक्कम वर्ग करावी, अशी मागणी जोर धरत आहे.

> आम्ही रोज कष्ट करून व्यवसाय करतो. पिंक रिक्षा योजनेमुळे आमचे उत्पन्न वाढेल आणि स्वतःची हक्काची रिक्षा मिळेल अशी आशा होती. परंतु, स्थानिक पातळीवर कोणतीही मदत किंवा स्पष्ट मार्गदर्शन मिळत नाही.
>
> – सायली वैराग, महिला रिक्षाचालक, श्रीवर्धन

# बेस्ट बसला टँकरची धडक

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

चेंबूरमध्ये बेस्ट बसला टँकरने धडक दिली. या अपघातात चार प्रवासी जखमी झाले. हा अपघात चेडा नगर सिग्नलजवळ बुधवारी (दि.१४) सकाळी ६.५५ वाजता झाला. जखमींमध्ये एक अल्पवयीन मुलगी, एक तरुणी आणि दोन पुरुषांचा समावेश आहे. दोन्ही जखमी महिलांना उपचारासाठी राजावाडी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. एका पुरुष प्रवाशाला किरकोळ दुखापत झाली असून दुसऱ्याला नातेवाईकांनी जवळच्या रुग्णालयात दाखल केले.

# अनोळखी पुरुषाचा मृतदेह आढळला

**पनवेल :** उरण तालुक्यातील शिवाजीनगर येथील जेट्टी परिसरात खाडीलगत एका अनोळखी पुरुषाचा मृतदेह आढळून आला आहे. या प्रकरणी उरण पोलीस ठाण्यात आकस्मिक मृत्यूची नोंद करण्यात आली असून, मृत व्यक्तीची ओळख पटविण्यासाठी पोलिसांनी नागरिकांना आवाहन केले आहे. हा मृतदेह पनवेल येथील उपजिल्हा रुग्णालयात आणण्यात आला. मृत व्यक्तीचे वय अंदाजे ४० ते ४५ वर्षे असून, मृतदेह पाण्यात कुजलेल्या अवस्थेत होता. मृत व्यक्तीने काळ्या रंगाचा टी-शर्ट, निळ्या रंगाची ट्रॅक पँट आणि पायात सँडल घातलेली होती. शिवाजीनगर, उरण येथील खाडीलगत हा मृतदेह वाहून आलेल्या अवस्थेत आढळल्याची माहिती पोलिसांना मिळाली. मच्छीमार सागर घरत यांनी याबाबत पोलिसांना माहिती दिली. या प्रकरणाचा तपास पोलीस उपनिरीक्षक शिवाजी पोफळे करीत आहेत. मृत व्यक्तीबाबत कोणाला काही माहिती असल्यास त्यांनी उरण पोलीस ठाण्याशी किंवा तपास अधिकारी शिवाजी पोफळे (मोबा. ९८२११८१२९६) यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.



# रेवा ज्युनियर कॉलेजला संगणक भेट

**। रोहा । प्रतिनिधी ।**

मुंबई येथील सामाजिक कार्यकर्ते सुहेल कुरेशी यांच्यावतीने रोहे शहरातील रोहा एज्युकेशनल अँड वेल्फेअर असोसिएशन व रोहा अष्टमी अल खैरिया कमिटी यांच्या संयुक्त विद्यमाने सुरू असलेल्या ज्युनियर कॉलेज ऑफ सायन्स या शाखेला संगणक भेट देण्यात आली. यावेळी अल खैरिया कमिटीचे सचिव मुबिन करजीकर, फारुक सवाल, मन्सूर नाडकर, प्राध्यापिका सुमय्या फैसल मुजावर आदी मान्यवर उपस्थित होते.

# जिजाऊ संघटनेचा शैक्षणिक मदतीचा जागर

**■ ३६ विभागांतील जि.प. शाळांमध्ये वह्यावाटप**

**। वावोशी । प्रतिनिधी ।**

ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य उपलब्ध करून देत त्यांच्या शिक्षणाला प्रोत्साहन देण्याच्या उद्देशाने जिजाऊ शैक्षणिक व सामाजिक संस्था, महाराष्ट्र आणि जिजाऊ संघटना, महाराष्ट्र राज्य यांच्या वतीने मोफत वह्या वाटपाचा उपक्रम राबविण्यात आला. चिलठण हायस्कूलसह ३६ विभागांतील सर्व जिल्हा परिषद शाळांमध्ये विद्यार्थ्यांना मोफत वह्यांचे वाटप करण्यात आले.



ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी आवश्यक साहित्य उपलब्ध व्हावे, आर्थिक अडचणींमुळे त्यांच्या शिक्षणात अडथळे निर्माण होऊ नयेत आणि विद्यार्थ्यांना शिक्षणाची प्रेरणा मिळावी, या हेतूने हा उपक्रम आयोजित करण्यात आला होता. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीसाठी सामाजिक बांधिलकी जपत राबविण्यात आलेल्या या उपक्रमाचे उपस्थितांनी कौतुक केले.

**गुहागरमध्ये उभारणार ‘फिल्म टूरिझम’ प्रकल्प | सांस्कृतिक कार्यमंत्री आशिष शेलार यांचे निर्देश**

# कोकणात चित्रपटसृष्टीला मिळणार बळ

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

रत्नागिरी जिल्ह्यातील गुहागर तालुक्यातील पालशेत येथे शासकीय भूखंडावर चित्रपट निर्मिती आणि पर्यटनाला चालना देण्यासाठी ‘फिल्म टूरिझम’ प्रकल्प उभारण्याबाबत महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाच्या (एमटीडीसी) संयुक्त भागीदारीत सविस्तर प्रस्ताव तयार करावा, असे निर्देश सांस्कृतिक कार्यमंत्री आशिष शेलार यांनी दिले. या प्रकल्पासाठी चित्रपट पर्यटन योजनेंतर्गत निधी उपलब्ध करून घेण्याच्या दृष्टीने म्हाडाची मदत घेण्याबाबतही विचार करावा आणि संपूर्ण प्रस्ताव महिनाभरात सादर करावा, असे निर्देश मंत्री शेलार यांनी दिले.



रत्नागिरी जिल्ह्यातील गुहागर तालुक्यातील मौजे पालशेतसह परिसरातील शासकीय जागांचा उपयोग करून चित्रपट निर्मितीसाठी शासनामार्फत योजना तयार करण्याबाबत मंत्री आशिष शेलार यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रालयातील त्यांच्या दालनात बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीत माजी आमदार डॉ. विनय नातू यांनी कोकणात चित्रपट निर्मितीसाठी आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्याबाबत विविध सूचना मांडल्या.

गुहागर आणि दापोली तालुक्यांतील निसर्गरम्य समुद्रकिनारे आणि पर्यटनस्थळे चित्रपटांच्या चित्रीकरणासाठी उपयुक्त आहेत. या परिसरात अनेक मराठी चित्रपट आणि मालिकांचे चित्रीकरण झाले आहे. मात्र, चित्रीकरणासाठी आवश्यक परवानग्या आणि सुविधा वेळेत उपलब्ध होण्यात अडचणी येतात. या पार्श्वभूमीवर चित्रीकरणासाठी एकाच ठिकाणी आवश्यक सुविधा उपलब्ध करून दिल्यास चित्रपट निर्मितीला चालना मिळेल, तसेच स्थानिक पातळीवर रोजगाराच्या संधी निर्माण होतील, असे डॉ. नातू यांनी सांगितले. गुहागर तालुक्यातील पालशेत, वेळणेश्वर आणि तवसाळ येथील शासकीय जागांचा उपयोग करून चित्रपट निर्मितीसाठी आवश्यक सुविधा विकसित करण्याची सूचनाही त्यांनी केली. या जागांवर सार्वजनिक-खासगी भागीदारीच्या (पीपीपी) माध्यमातून सुविधा उभारण्याबाबत बैठकीत चर्चा झाली.

### १२५ एकर शासकीय जागा उपलब्ध

पालशेत येथे पर्यटन विभागाची शासनाच्या मालकीची सुमारे १२५ एकर जागा उपलब्ध आहे. या जागेवर पर्यटन आणि चित्रपट उद्योगाला प्रोत्साहन देण्याच्या दृष्टीने पायाभूत सुविधा विकसित कराव्यात, अशी सूचना माजी आमदार डॉ. विनय नातू यांनी शासनाकडे केली होती. या ठिकाणी शासनामार्फत फिल्मसिटी उभारल्यास परिसरात मोठ्या प्रमाणात रोजगाराच्या संधी निर्माण होऊ शकतात, असेही त्यांनी निदर्शनास आणून दिले.

## निवडक



### अवसरे शाळेचे स्पर्धा परीक्षेत यश

**माथेरान :** रायगड जिल्हा परिषद केंद्र दहिवली मालेगाव अंतर्गत शाळा अवसरे येथील दर्शन विजय गायकर याला पंचायत समिती शिक्षण विभाग कर्जत आणि रायगड गणित विज्ञान संबोध शिष्यवृत्ती परीक्षा २०२५-२६ अंतर्गत झालेल्या जिल्हास्तरीय स्पर्धा परीक्षेत सुयश प्राप्त झाले. अभिनव ज्ञान मंदिर कर्जत येथे (दि.१३) पार पडलेल्या बक्षीस वितरण सोहळ्यात गटशिक्षणाधिकारी अनंत खैरे, शिक्षण विस्तार अधिकारी नारायण सोनवणे, शिक्षण विस्तार अधिकारी पी.एस. म्हात्रे, पारधी, जाधव आणि सर्व केंद्रप्रमुखांच्या उपस्थितीत दर्शन गायकर यास प्रमाणपत्र आणि ट्रॉफी देऊन सन्मानित करण्यात आले. वर्गशिक्षिका राजश्री थोरात यांचाही गौरव करण्यात आला. कार्यक्रमास गणित विज्ञान मंडळाचे अध्यक्ष, सर्व सदस्य, कर्जत तालुक्यातील सर्व केंद्रप्रमुख, गट साधन केंद्राचे अधिकारी वर्ग उपस्थित होते. शिवाय कर्जत तालुक्यातील बहुसंख्येने शिक्षक वर्ग उपस्थित होते. यापूर्वी अवसरे शाळेने स्कॉलरशिप परीक्षेत सलग सुयश प्राप्त केले आहे.



### महिला शेतकरी प्रमाणपत्र शिबीर

**कोलाड :** रोहा तालुक्यातील पहूर गावात महिला शेतकऱ्यांना डिजिटल शेतकरी प्रमाणपत्र मिळवून देण्यासाठी आयोजित करण्यात आलेले विशेष शिबीर यशस्वीरीत्या पार पडले. पेण विधानसभा क्षेत्रातील अनुलोम मित्र दीक्षा उमासरे यांच्या पुढाकाराने आणि सहकार्याने मंगळवारी (दि.१३) हे शिबीर घेण्यात आले. या शिबिरात रोहा तालुका कृषी विभागाच्या सहाय्यक तालुका कृषी अधिकारी तृप्ती सावंत यांनी महिलांना डिजिटल शेतकरी प्रमाणपत्रे काढून देण्यासाठी आवश्यक प्रक्रिया पूर्ण केली. सकाळी ११ वाजल्यापासून सायंकाळी ६.३० वाजेपर्यंत हे शिबीर सुरू होते. या शिबिरात एकूण ७४ महिलांना डिजिटल शेतकरी प्रमाणपत्रे काढून देण्यात आली. शेतकरी महिलांना शासकीय योजनांचा लाभ घेण्यासाठी आवश्यक असलेले प्रमाणपत्र मिळवून देण्याच्या दृष्टीने हे शिबीर उपयुक्त ठरले.



### अंबिका ज्वेलर्सतर्फे शिक्षकांचा सन्मान

**खांब :** विद्यार्थ्यांना केवळ पुस्तकी ज्ञान न देता त्यांच्या व्यक्तिमत्त्वाला आकार देणे, त्यांच्यामध्ये संस्कार रुजविणे आणि त्यांना उज्ज्वल भविष्याची दिशा दाखविण्याचे महत्त्वपूर्ण कार्य शिक्षक करीत असतात. शिक्षकांच्या याच अमूल्य योगदानाची दखल घेत रोहा शहरातील नामांकित व विश्वासार्ह पेढी म्हणून विशेष ओळख असलेल्या अंबिका ज्वेलर्सच्या वतीने शिक्षकांचा सन्मान करण्याचा स्तुत्य उपक्रम हाती घेण्यात आला आहे. ५ सप्टेंबर या शिक्षक दिनाचे औचित्य साधून या उपक्रमाचा प्रारंभ करण्यात आला. विशेष म्हणजे, शिक्षकांचा सन्मान करण्यासाठी त्यांना एखाद्या ठिकाणी बोलावून न घेता, अंबिका ज्वेलर्सचे प्रतिनिधी स्वतः विविध शाळांना भेटी देऊन शिक्षकांचा गौरव करीत आहेत. या उपक्रमांतर्गत शिक्षकांना भेटवस्तू प्रदान करून, त्यांच्या शैक्षणिक व सामाजिक कार्याचा गौरव करणारे सन्मानपत्र देऊन त्यांचा सन्मान करण्यात येत आहे.



### बोरखारला रंगला ‘खेळ पैठणीचा’

**चिरनेर :** जय भवानी नवरात्रौत्सव मंडळ, बोरखार आयोजित आणि तेजस डाकी पुरस्कृत ‘चला जिंकू या पैठणी’ या स्पर्धेचे मंगळवारी (दि.१३) आयोजन करण्यात आले होते. स्पर्धेचे उद्घाटन समाजसेवक तेजस डाकी व उद्योजक प्रवीण घासे यांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी बोरखार गावचे अध्यक्ष तेजस डाकी, ॲड. धिरज डाकी, युवा कार्यकर्ते राकेश तांडेल, चंद्रकांत डाकी, मेघनाथ डाकी, राजू गावंड, प्रजीव म्हसकर आदी उपस्थित होते. या स्पर्धेत शर्मिला पाटील प्रथम क्रमांकाची मानकरी ठरली. तिला पैठणी साडी व युवा उद्योजक प्रवीण घासे यांच्या सौजन्यातून पाच हजार रुपयांचे रोख बक्षीस व मिक्सर देण्यात आला. जागृती गावंड द्वितीय क्रमांकाने गौरविण्यात आले. तिला पैठणी साडी व कुकर देण्यात आला. रुपाली तांडेल ही तृतीय क्रमांकाची धनी ठरली. तिला पैठणी साडी व डिनर सेट देऊन सन्मानित करण्यात आले. तसेच सहभागी स्पर्धकांना आकर्षक बक्षीसे देण्यात आली.

### एम.पी.एस.एस स्कूलला पुरस्कार



**कोलाड :** ईएसएफई आणि टाइम्स ऑफ इंडिया यांच्या संयुक्त विद्यमाने ६ ते ८ ऑक्टोबर २०२६ रोजी नेस्को मुंबई एक्सिबिशन सेंटर गोरेगाव मुंबई येथे घेण्यात आलेल्या (मोस्ट एक्स्ट्रा सररिक्युलर एक्टिव्हिटी) या शिक्षणोपयोगी कार्यक्रम विभागात उल्लेखनीय कामगिरी केलेल्या रोहा तालुक्यातील आंबेवाडी येथील एम.पी.एस.एस इंग्लिश मिडीयम स्कूलला स्टार एज्युकेशन पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. यावेळी महाराष्ट्रातील नामांकित शाळांना, प्राध्यापकाना, संस्थापकांना पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले. यावेळी महाराष्ट्रातील नामवंत संस्थेचे संस्थापक, प्रिन्सिपल, शिक्षक उपस्थित होते. एम.पी.एस.एस इंग्लिश मिडीयम स्कूल या स्कूलमध्ये आतापर्यंत स्काऊट गाईडमधील विद्यार्थ्यांना राज्यपुरस्कार प्राप्त झाले आहेत. तसेच मैदानी खेळामध्ये तालुका, जिल्हा, राज्यस्तरावर नाव गाजवत आहेत.

## निवडक




### नुकसानीचे पंचनामे करण्याची मागणी

**आगरदांडा :** पावसाअभावी शेतीचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. नुकसानग्रस्त शेतकऱ्यांच्या शेतांचे तातडीने पंचनामे करून त्यांना योग्य ती आर्थिक भरपाई देण्यात यावी, अशी मागणी मनिष नादगावकर यांनी तहसीलदार आदेश डफळ यांना निवेदनाद्वारे केली आहे. शेती मोठ्या प्रमाणात पावसावर अवलंबून असल्याने पावसाच्या अनियमिततेचा शेतीपिकांना मोठा फटका बसला आहे. त्यामुळे शेतकरी आर्थिक संकटात सापडले आहेत. तसेच वादळी वाऱ्यामुळेही पिकांचे नुकसान झाले असल्यास त्याची दखल घेऊन संबंधित शेतकऱ्यांना मदत मिळावी, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली आहे. प्रशासनाने या परिस्थितीची गांभीर्याने दखल घेऊन नुकसानग्रस्त शेतीचे तातडीने पंचनामे करावेत आणि बाधित शेतकऱ्यांना शासनाच्या नियमानुसार आर्थिक मदत मिळवून द्यावी, अशी विनंती नादगावकर यांनी केली आहे.



### कोटेश्वरी मातेच्या चरणी भजनसेवा

**आगरदांडा :** मुरूड शहराजवळील कोटेश्वरी मातेच्या चरणी नालासोपारा येथील इंडियन आयडॉल मराठी विजेत्या श्वेता दांडेकर यांनी भजनगायनातून आपली सेवा समर्पित केली. त्यांच्या सुमधुर स्वरांनी उपस्थित भाविक मंत्रमुग्ध झाले. या भजनसेवेला बाजारपेठ येथील हार्मोनियम वादक प्रदीप बागडे आणि लक्ष्मीखार येथील तबलावादक अशोक कमाने यांनी आपल्या सुरेल वादनाची साथ दिली. त्यांच्या वादनामुळे भजनांना अधिक रंगत आली. तसेच बाजारपेठ येथील महिला भजन मंडळांनीही गायिका श्वेता दांडेकर यांच्या सुरात सूर मिसळत भजनगायनात उत्स्फूर्त सहभाग घेतला. गायन, वादन आणि सामूहिक भजनांच्या सुरेल संगमातून मुरूड कोटेश्वरी मातेच्या चरणी भक्ती भावाने सेवा अर्पण करण्यात आली. या भावपूर्ण भजनसेवेमुळे उपस्थित भाविकांना भक्तीरसाचा अनुभव मिळाला आणि वातावरण भक्तीमय झाले होते.

### बेलपाडा मैदानावर हुपू पक्ष्यांचा थवा

**पनवेल :** खारघर येथील बेलपाडा मैदानावर आठ ते दहा हुपू (हुदहुद) पक्ष्यांचा थवा पाहायला मिळाला. एरवी एकाकी आढळणारे हे पक्षी एकत्र दिसल्याने स्थानिक नागरिक, क्रीडापटू आणि पक्षीप्रेमींना निसर्गाचा अनोखा अनुभव घेता आला. बेलपाडा गावाजवळील या मैदानावर सकाळी क्रिकेटच्या सरावासाठी खेळाडू येतात. सराव सुरू असताना मैदानाच्या एका बाजूला हुपू पक्षी हिरव्या गवतात कीटक आणि कृमी शोधताना दिसले. डोक्यावरील वैशिष्ट्यपूर्ण तुरा आणि अंगावरील काळ्या-पांढऱ्या पट्ट्यांमुळे त्यांनी उपस्थितांचे लक्ष वेधून घेतले. हुपू पक्ष्याची लांब चोच, डोक्यावरील शेंडीसारखा तुरा तसेच शेपटी, पाठ आणि पंखांवरील काळ्या-पांढऱ्या पट्ट्यांमुळे त्याचे रूप वैशिष्ट्यपूर्ण दिसते. हा पक्षी झाडांच्या खोडांतील ढोली किंवा इमारतींच्या फटींमध्ये घरटे करतो. बेलपाडा मैदानावर या पक्ष्यांचा थवा दिसल्याने परिसरातील निसर्गप्रेमींमध्ये उत्सुकता निर्माण झाली आहे.



## क्लासिफाईड
जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी

- **सन स्टोन रीअल इस्टेट** अलिबाग ते मांडवा बंगलो+प्लॅट+रिसॉर्ट भाड्याने पाहिजे. N.A.plot + शेतजमिन खरेदी व विक्री करुन मिळेल. शेतकरी करतो. ८६६९००६९०२ साइना कॉम्प्लेक्स opp.चर्च बायपास रोड.
- **अलिबाग येथील ऑफिससाठी स्टाफ पाहिजे!** ऑफिसमध्ये काम करण्यासाठी कर्मचारी आवश्यक. आकर्षक पगार मुलाखतीसाठी संपर्क साधा! ९९२३७५०५४९, ९१०५७१७०३८
- **नागाव येथे रिसोर्टमध्ये हाऊस किपिंग** या कामासाठी मुले पाहिजे आहेत आणि ऑल राऊंडर शेफ पाहिजे आहे. (मोबा. नं. ९३७१७१४५५२)
- **चेंढरे येथे सोसायटी/कनव्हेंस डिड** झालेल्या नवीन इमारतीमधील तीन २ बीएचके रेडी पझेशन फ्लॅट विकणे आहेत. संपर्क : ८१८०८६१२३४/८१८०८५१२३४ एजंट क्षमस्व.
- **अलिबागपासून जवळच असलेल्या फार्महाऊसमध्ये** वाडीत काम करणारे जोडपे हवे आहे. राहण्याची सोय आहे. संपर्क क्रमांक ९८२२९३८४४४
- **ऑफिस कामासाठी मुलगी हवी आहे.** मो. ७४९८५५५७४०, ९३७३७५८८५०
- **अलिबागमधील आर्किटेक्चर आणि इंटिरियर डिझायनिंग** ऑफिसकरीता ऑटो कॅड ड्राफ्टसमन हवा आहे. संपर्क : ९७६२७७७९७५
- **प्लम्बिंग कामासाठी हेल्पर पाहिजेत.** वेळ ९ ते ७, पगार १०,०००/- संपर्क ९८२२००१८५३
- **कर्मचारी भरती बर्गर्स अँड बूच,** रांजणपाडा नवीन उमेदवारांचे स्वागत! हॉटेल व्यवसायात करिअर करण्याची उत्तम संधी. सुरुवातीचा पगार ₹१६,०००, ३ महिन्यांच्या प्रशिक्षणानंतर ₹१८,०००. सर्व्हिस चार्जमधून अतिरिक्त उत्पन्न. ९ तासांची शिफ्ट. दर मंगळवारी सुट्टी. जेवण व राहण्याची सोय उपलब्ध. संपर्क/व्हॉट्सअॅप : ७५०६९५४६११
- **अलिबाग एसटी स्टँडजवळ दुकानगाळा** विक्री करणे आहे. ९७६४५४८६७९

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१

# उरण तालुक्यात भातशेती संकटात

**। चिरनेर । प्रतिनिधी ।**

उरण तालुक्यात पावसाची दीर्घ उघडीप लांबविल्याने खरीप हंगामातील भातशेती संकटाच्या छायेत सापडली आहे. त्यामुळे तालुक्यातील भातशेती करणारा शेतकरी चिंतेत सापडला आहे. तालुक्यातील भातशेती जरी हिरवीगार दिसत असली तरी प्रत्यक्ष परिस्थिती अतिशय चिंताजनक आहे. खरीप हंगामातील भातशेतीसह पुढची रब्बी हंगामातील कडधान्य पिके जमिनीच्या ओलाव्या अभावी शेतकऱ्यांना घेता येणार नाहीत.

दरम्यान, पाणथळीच्या जागा वगळता बहुतांशी शेती कोरडी पडून, भातशेती जमिनीला भेगा गेल्या आहेत. यामुळे बहरलेली भातपिके संकटात आली आहेत.



- **जमिनीला भेगा पडल्याने शेतकऱ्यांच्या चिंतेत वाढ**
- **वर्षभर धान्याची गरज भागविणे झाले कठीण**

पावसाने रायगड जिल्ह्यासह उरण तालुक्यात पाठ फिरविल्याने शेती कोरडी पडली आहे.

दरम्यान, भातशेती लागवड करणारा येथील शेतकरी हातात तोंडाशी आलेले भात पीक वाचवण्यासाठी धडपडत आहे. ज्या शेतकऱ्यांकडे विहिरी, तलाव व पाण्याच्या पंपाची व्यवस्था आहे. तालुक्यातील शेतकरी भातशेतीला कृत्रिम पाणीपुरवठा करत आहेत. काही शेतकऱ्यांनी ओढ्या नाल्याचे पाणी आडवून पाणी भातशेतीकडे वळविण्याचा प्रयत्न सुरू केला आहे. जवळजवळ पावसाने पाठ फिरवून महिनाभराचा कालावधी उलटत आला असून, शेतकरी आकाशाकडे डोळे लावून पावसाची चातकासारखी वाट पाहत आहेत.

**शेतीवर संकटाची कुऱ्हाड**

नैसर्गिक आपत्तीमुळे उरणच्या भात शेतीवर संकटाची कुऱ्हाड कोसळली असून भाताचे कोठार असलेल्या उरण तालुक्यातील भातशेती धोक्यात आली आहे. त्यामुळे दुष्काळजन्य परिस्थिती निर्माण होईल. याची खात्री पटू लागली आहे.

यंदा समाधानकारक उत्पादन हाती येईल अशी आशा शेतकऱ्यांना होती. मात्र, सप्टेंबरमध्ये पावसाची अनियमितता आणि ऑक्टोबर महिन्याच्या सुरुवातीपासून जाणवणारी उकडीप यामुळे शेतकऱ्यांच्या आशेवर पाणी फिरण्याची चिन्हे दिसू लागली आहेत. यंदा उत्पादनात निश्चित घट होणार असल्यामुळे वर्षभराची धान्याची गरज शेतकऱ्यांना भासविणे कठीण होऊन जाणार असल्याची व्यथा येथील शेतकऱ्यांनी व्यक्त केली.

तालुक्यातील कृषी विभाग व महसूल खात्याने तालुक्यातील बाधित शेतीची पाहणी करून पिकांच्या सद्यस्थितीचा आढावा घेऊन खरीप हंगामी शेतीच्या नुकसानीबाबत आवश्यक उपाययोजना निश्चित कराव्यात अशी अपेक्षा शेतकऱ्यांनी व्यक्त केली आहे.

## हिरवे गुरुजी चौकातील स्मारकाची दुरवस्था

**। खांदा कॉलनी । प्रतिनिधी ।**

पनवेल शहरात स्वच्छ आणि सुंदर पनवेल अभियान राबविले जात असताना, दुसरीकडे राजकीय पक्षांच्या कार्यक्रमांसाठी शहरात ठिकठिकाणी लावले जाणारे झेंडे कार्यक्रम संपल्यानंतरही तसेच राहात असल्याचे चित्र दिसत आहे. पनवेलमधील हिरवे गुरुजी चौकातील स्मारक परिसरातही झेंडे लावण्यात आले होते. मात्र, कार्यक्रम संपल्यानंतर ते हटविण्याचा विसर पडल्याचे दिसून येत आहे. यावर सैनिकांची नावे लिहलेली आहेत. याच ठिकाणी दरवर्षी १५ ऑगस्ट रोजी स्वातंत्र्यदिन साजरा केला जातो. त्यामुळे ऐतिहासिक व सार्वजनिक महत्त्व असलेल्या या स्मारकाची देखभाल आणि स्वच्छता राखणे आवश्यक आहे. एका बाजूला स्वच्छतेचे आवाहन करायचे आणि दुसऱ्या बाजूला कार्यक्रमानंतर झेंडे व इतर साहित्य तसेच सोडून द्यायचे, अशा प्रकारांमुळे स्वच्छता अभियानाच्या उद्देशावर प्रश्नचिन्ह निर्माण होत आहे. संबंधित राजकीय पक्षांनी कार्यक्रमानंतर झेंडे हटवावेत, तसेच महापालिकेने स्मारकाची दुरुस्ती करून परिसर स्वच्छ ठेवण्यासाठी लक्ष द्यावे, अशी अपेक्षा नागरिकांकडून व्यक्त होत आहे.










● अलिबागमधील श्रीबाग २ मध्ये अंबामाता मंदिरात मंगळवारी संध्याकाळी चमचा लिंबू स्पर्धा घेण्यात आली. त्यानंतर रात्री गरबा आणि दांडिया रासचे आयोजन करण्यात आले होते.

## पनवेलमधून विवाहित महिला मुलीसह बेपत्ता

**। पनवेल । प्रतिनिधी ।**

पनवेल तालुक्यातील पारगाव येथून २१ वर्षीय सुमितीकुमारी सोनुकुमार राम आणि तिची तीन वर्षांची मुलगी बेपत्ता झाल्याची तक्रार पनवेल शहर पोलीस ठाण्यात दाखल झाली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, दोघीही राहत्या खोलीतून कोणालाही काही न सांगता निघून गेल्या. याप्रकरणी गुन्हा नोंदविण्यात आला असून, सहायक पोलीस निरीक्षक अजित बिरादार तपास करीत आहेत. बेपत्ता महिला सुमितीकुमारी सोनुकुमार राम हिचे वय २१ वर्षे, रंग सावळा, उंची सुमारे ५ फूट, शरीराने सडपातळ, नाक सरळ, चेहरा गोल, पाठीवर काळा तीळ असून, बेपत्ता होताना तिने काळ्या रंगाचा पोशाख आणि पायात सॅन्डल घातले होते.



बेपत्ता मुलगी संध्या ती ३ वर्षाची असून उंची ३ फूट, शरीराने सडपातळ, चेहरा गोल असून, बेपत्ता होताना तिने पिवळ्या व निळसर रंगाचा पंजाबी ड्रेस, पायात काळ्या रंगाचे सॅन्डल घातले होते. या महिला व मुलीबाबत कोणाला माहिती मिळाल्यास पनवेल शहर ठाणे किंवा सहायक पोलीस निरीक्षक अजित बिरादार यांच्याशी सपर्क साधण्याचे आवाहन केले आहे.

## व्हिबग्योर शाळेसमोरील मॅनहोल धोकादायक

**। पनवेल । प्रतिनिधी ।**

खारघरमधील व्हिबग्योर शाळेसमोरील रस्त्यावरील धोकादायक मॅनहोलमुळे विद्यार्थी, पालक आणि वाहनचालकांच्या सुरक्षेचा प्रश्न निर्माण झाला आहे. संभाव्य अपघात टाळण्यासाठी महापालिका प्रशासनाने तातडीने दखल घ्यावी अशी मागणी पालकांनी केली आहे. शाळा भरण्याच्या आणि सुटण्याच्या वेळेत या परिसरात मोठी वर्दळ असते. दुर्घटना घडण्यापूर्वीच प्रशासनाने मॅनहोलची दुरुस्ती करून मजबूत झाकणे बसवावीत आणि परिसरातील मॅनहोलची तपासणी करावी, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

## वन जमिनीतील शेकडो झाडे तोडली

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

कर्जत तालुक्यातील चाफेवाडी या भागातील जंगलात अज्ञात लोकांकडून झाडांची तोड करण्यात आली आहे. ऐन पावसाळ्यात झाडे तोडण्यात आल्याची माहिती मिळताच वन विभागाचे कर्मचारी तेथे पोहचले. दरम्यान, या जंगलतोड बद्दल वन विभागाने गुन्हा दाखल केला असून वन विभागाला जंगलातील शेकडो सागाची झाडे तोडणारे सापडत नाहीत. या गंभीर प्रकाराची दखल वन विभागाने घेतली असून तेथे वरिष्ठ अधिकाऱ्यांनी पाहणी केली आहे.

नेरळ पश्चिम वनक्षेत्र परिसरात चाफेवाडी हे आदिवासीवाडी आहे. या भागातील बहुसंख्य शेतकरी हे आदिवासी असून त्यांच्या वडिलोपार्जित जमिनीवर वन हक्क कायद्याने ताबा मिळाला आहे. त्या भागात मोठ्या प्रमाणात संरक्षित वन असून लोकवस्ती तुरळक आहे. अशा परिसरात जंगलतोड करून चोरीने ती लाकडे लंपास करण्याचा गोरख व्यवसाय जंगलतोड करणारे करीत असतात. गतवर्षी याच चाफेवाडीचे जंगलात जंगलतोड केली होती पण त्याचा सुगावा वन विभागाला लागला नव्हता. यावर्षी त्याच ठेकेदार किंवा जंगलतोड करणारे यांच्याकडून शेकडो झाडांवर इलेक्ट्रिक करवतीचे सहाय्याने झाडे कापण्याचे उद्योग झाले आहेत.



ऑक्टोबर महिन्याचे पहिल्या एक दोन दिवसात शेकडो सागवान लाकडे यांची तोड करण्यात आली होती.ती झाडे तोडून काही दिवस ठेवण्याचा जंगलतोड करणारे यांचा डाव होता. मात्र वन कर्मचारी कारोटे हे जंगलात फिरत असताना त्यांना आदिवासी जमिनीच्या बाजूला असलेल्या वन क्षेत्रात शेकडो झाडे तोडली असल्याचे दिसून आले. त्यानंतर जिल्हा उप वन संरक्षकांच्या आदेशाने पाहणी करून या गंभीर प्रकाराची नोंद त्या लाकडाचे ओंडके चिल्हार नदी येथे आणून पोही या वन डेपोमध्ये जमा केले आहेत. या जंगलतोड बद्दल कर्जत वन विभागाने दोन गुन्हे दाखल केले आहेत. त्यात आदिवासी क्षेत्रातील विना परवाना झाडे तोडणे आणि वन जमिनीमधील झाडे तोडणे असे दोन गुन्हे दाखल केले आहेत. वन जमिनीमधील झाडे तोडण्याची कोणालाही परवानगी नाही आणि असे असताना झाडे तोडण्यात आल्याने गंभीर गुन्हा दाखल झाला आहे.

## भापट गावात 'जलार्पण' दिवस उत्साहात

**। म्हसळा । प्रतिनिधी ।**

म्हसळा तालुक्यातील ग्रुप ग्रामपंचायत कोळवट हद्दीतील भापट येथे सोमवारी (दि.१२) 'जलार्पण दिवस' उत्साहात साजरा करण्यात आला. या निमित्ताने गावातील जलस्रोतांचे पूजन, जलसंवर्धनाचे महत्त्व आणि पाण्याचा योग्य वापर याबाबत जनजागृती करणारे उपक्रम राबविण्यात आले. यावेळी बबन मनवे आणि अनिल बसवत यांनी उपस्थितांना जलसंवर्धनाचे महत्त्व पटवून दिले. वाढती पाणीटंचाई, भूजल पातळीतील घट आणि बदलते हवामान यांचा विचार करता पाण्याचा काटकसरीने वापर करणे आणि उपलब्ध जलस्रोतांचे संरक्षण करणे आवश्यक बनले आहे. याच उद्देशाने जलार्पण दिवसाच्या माध्यमातून ग्रामस्थांमध्ये जलसंवर्धनाबाबत जागरूकता निर्माण करण्याचा प्रयत्न करण्यात आला.



**जिल्ह्यात सेवाकार्याची प्रेरणादायी चळवळ | विविध सामाजिक, पर्यावरणपूरक उपक्रम**

## लायन्सच्या ऑक्टोबर सेवा सप्ताहचा समारोप

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

इंटरनॅशनल लायन्स क्लबच्या डिस्ट्रिक्टच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या ऑक्टोबर सेवा सप्ताहचा भव्य समारोप वाशी, नवी मुंबई येथे उत्साहात सेवाभाव, सामाजिक बांधिलकी, पर्यावरण संवर्धन आणि मानवतेचा संदेश देणाऱ्या या उपक्रमाने संपूर्ण जिल्ह्यात सेवाकार्याची प्रेरणादायी चळवळ उभी केली. पारंपरिक महाराष्ट्रीयन लेझीम आणि ताशाच्या गजरात मान्यवरांचे स्वागत करण्यात आले. प्रथम जिल्हा ग्लोबल सर्विस टीमचे अध्यक्ष अनिल म्हात्रे यांनी ऑक्टोबर सेवा सप्ताह दरम्यान, राबविण्यात आलेल्या विविध उपक्रमांचा आणि साध्य केलेल्या यशाचा आढावा सादर केला. जिल्हा ग्लोबल सर्विस टीमचे अध्यक्ष अनिल म्हात्रे यांच्या संकल्पनेतून साकारलेल्या या उपक्रमामध्ये सदस्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला. 'एकत्र येऊन सेवा करूया' हा संदेश देत १ ते ९ ऑक्टोबर २०२६ या नऊ दिवसांच्या कालावधीत जिल्हाभरात विविध सामाजिक आणि पर्यावरणपूरक उपक्रम राबविण्यात आले. कर्करोग जनजागृतीसाठी कार व दुचाकी रॅलींचे आयोजन करण्यात आले.



ग्रामीण विद्यार्थ्यांना सायकली आणि शैक्षणिक साहित्याचे वाटप करून शिक्षणाला प्रोत्साहन देण्यात आले. अन्नदान, नेत्रतपासणी शिबिरे, नेत्रदान जनजागृती, मधुमेह तपासणी व जनजागृती, मानसिक आरोग्यविषयक कार्यक्रम, बालआरोग्य तपासणी शिबीरे आणि रक्तदान शिबिरांच्या माध्यमातून आरोग्य व समाजकल्याणासाठी महत्त्वपूर्ण योगदान देण्यात आले.

या कार्यक्रमास जिल्हा प्रांतपाल प्रवीण सरनाईक, विजय कुमार राजू, पंकज मेहता, मनीष लाडगे, फिरोज कात्रक, विजय गणात्रा, डॉ. नमिता मिश्रा, नयन कवळे तसेच विविध लायन्स क्लबचे पदाधिकारी व सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते.

पर्यावरणपूरक साहित्याचा वापर करून तयार करण्यात आलेल्या या प्रदर्शनांमधून सर्जनशीलता, सामाजिक बांधिलकी आणि पर्यावरण संवर्धनाचा संदेश देण्यात आला.

**पर्यावरण रक्षणासाठी महत्त्वाचे योगदान**

पर्यावरण संवर्धनाच्या दृष्टीने १,५०० झाडांची लागवड करण्यात आली. ई-कचरा जनजागृती, ई-कचरा संकलन आणि स्वच्छता मोहिमांच्या माध्यमातून पर्यावरण रक्षणाचा संदेश देण्यात आला. आदिवासी भागातील नागरिकांना पाणीपुरवठ्याच्या सुविधांसाठी सौरऊर्जा पॅनेल उपलब्ध करून देण्यात आले.

# पर्यावरणाची गोदाम माफियांकडून गळचेपी

। उरण । प्रतिनिधी ।

उरणमध्ये औद्योगिकीकरणाचा धुरळा उडत असताना पर्यावरणाचा मात्र श्वास कोंडला जात आहे. एकीकडे विकासाच्या नावाखाली गोदामांचे जाळे विस्तारत आहे, तर दुसरीकडे हिरवळ आणि निसर्गाचा समतोल राखण्याच्या नियमांना हरताळ फासला जात असल्याचा आरोप पर्यावरणप्रेमी संस्थांकडून करण्यात येत आहे. गोदामधारकांच्या मनमानीला लगाम घालण्याऐवजी संबंधित शासकीय यंत्रणा नेमकी करतेय तरी काय? असा संतप्त सवाल आता उरणकरांकडून उपस्थित केला जात आहे.

गोदामांसाठी मंजूर क्षेत्रापैकी ३० टक्के जागेत झाडे लावून त्यांचे संगोपन करण्याची अट असल्याचा दावा केला जात आहे. मात्र, प्रत्यक्षात अनेक गोदामांच्या परिसरात पुरेशी झाडे दिसत नसल्याच्या तक्रारी आहेत. ३० टक्के हरित क्षेत्र तर दूरच, साधी पाच टक्के जागाही वृक्षलागवडीसाठी वापरली जात नसल्याचा आरोप होत आहे. पर्यावरणाचे रक्षण करण्याऐवजी काँक्रीटचे साम्राज्य उभे राहत असेल, तर नियम केवळ कागदावरच ठेवायचे का, असा सवाल उपस्थित होतो.

इतकेच नव्हे, तर काही गोदाम धारक आपल्या अधिकृत क्षेत्राच्या बाहेरील जागेवरही अतिक्रमण करीत असल्याच्या तक्रारी पुढे येत आहेत. सार्वजनिक किंवा शासकीय जागा आपल्या मालकीची असल्याप्रमाणे वापरण्याचा प्रकार सुरू असल्याचा आरोप असताना संबंधित जागांची मोजणी, कागदपत्रांची तपासणी आणि प्रत्यक्ष पाहणी करण्याची जबाबदारी कोणाची? जिल्हाधिकारी कार्यालय, तहसील कार्यालयातील महसूल विभाग आणि संबंधित यंत्रणांनी या तक्रारींची दखल घेऊन वस्तुस्थिती स्पष्ट करावी, अशी मागणी पर्यावरणप्रेमी करीत आहेत.

नियम मोडणाऱ्यांवर कारवाईची जबाबदारी असलेल्या यंत्रणांनीच मौन धारण केले, तर सामान्य नागरिकांनी न्याय मागायचा कुणाकडे? तक्रारी होतात, प्रश्न उपस्थित केले जातात; मात्र ठोस कारवाई दिसत नसल्याची भावना नागरिकांमध्ये निर्माण होत आहे. या निष्क्रियतेमुळे गोदामधारकांचे धाडस वाढत असल्याचा आरोपही केला जात आहे. अधिकारी आणि गोदाममालक यांच्यातील कथित साटेलोट्याच्या आरोपांची निष्पक्ष चौकशी करून प्रशासनाने आपली भूमिका स्पष्ट करावी, अशी मागणी जोर धरत आहे.

पर्यावरण संरक्षणाच्या घोषणा आणि प्रत्यक्षातील कारभार यांच्यातील दरीही आता चर्चेचा विषय बनली आहे. प्लास्टिकबंदी असो वा वृक्षलागवडीचे नियम, पर्यावरणाच्या रक्षणासाठी कागदावर अनेक उपाययोजना दिसतात; पण उरणमध्ये त्यांची अंमलबजावणी कितपत होते, याचे उत्तर संबंधित विभागांनी द्यायला हवे. नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांना अभय मिळत असल्याची भावना नागरिकांमध्ये निर्माण झाली, तर प्रशासनावरील विश्वासाला तडा जाणे स्वाभाविक आहे.उरणचा विकास कोणाच्या मर्जीवर नव्हे, तर कायद्याच्या चौकटीत आणि पर्यावरणाचा समतोल राखूनच झाला पाहिजे. गोदामांच्या मंजूर नकाशांची तपासणी, हरित क्षेत्राच्या अटींची पडताळणी, अनधिकृत बांधकामे व अतिक्रमणांची चौकशी आणि दोषी आढळणाऱ्यांवर नियमानुसार कारवाई करण्याची मागणी होत आहे. यंत्रणांनी केवळ कागदी अहवालांचा खेळ न करता प्रत्यक्ष पाहणी करून कारवाईचा अहवाल जनतेसमोर ठेवावा. अन्यथा पर्यावरणाची होत असलेली गळचेपी रोखणार कोण, हा प्रश्न अनुत्तरितच राहणारा आहे.

# जमिनीची दुसऱ्यांदा विक्री केल्याप्रकरणी गुन्हा दाखल

**पनवेल :** जमिनीची दुसऱ्याला साठेकराराने विक्री करून फसवणूक केल्याप्रकरणी नांदगाव येथील शेतकऱ्याविरोधात पनवेल शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. नांदगाव येथील शेतकऱ्याने त्याची १४.९ गुंठे जमीन ८ फेब्रुवारी २००७ रोजी दिनेश शहा यांच्याकडून मोबदला घेऊन नोंदणीकृत साठे कराराने विक्री केली होती. पहिला व्यवहार चालू असताना सदरची जमीन ही पुन्हा मदन कोळंबेकर यांच्याकडून व्यवहारातील संपूर्ण मोबदला स्वीकारला आणि चार मार्च २००८ रोजी नोंदणीकृत साठेकराराने विक्री करून त्यांची फसवणूक केली.

**महाराष्ट्र शासन**
**महसूल व वन विभाग**
**उपसंचालक भूमि अभिलेख, कोंकण प्रदेश, मुंबई यांचे कार्यालय**
डी.डी. बिल्डींग, १ला मजला जुने जकात घर, शहीद भगतसिंह मार्ग,
फोर्ट मुंबई - ४००००१
☎ ०२२२२७०१७३८. ✉ ddimumbai@gmail.com

पेपर नोटीस
क्र.अपील एस.आर.२२१/२०२६
मुंबई, दिनांक: १०/०९/२०२६

**अपिलदार**
मुंबई सेझ लिमिटेड कंपनी तर्फे श्री सचिन काशिनाथ बालवाड
रा.एन एम एस इ झेड हाउस, सेक्टर नंबर १०ब, कोपर न्हावा रोड, शिवाजी नगर जवळ, उलवे (प). पनवेल, नवी मुंबई- ४१०२०६

**विरुद्ध** **जाबदार**

१. दिपक दामा डाकी
२. श्री प्रदीप दामा डाकी
३. श्रीमती जया गणेश पाटील
४. श्रीमती दमयंती दामा पाटील
५. श्रीमती प्रभावती दामोदर डाकी
६. श्रीमती बामुबाई पांडुरंग घरत
७. श्रीमती सावित्री बापू डाकी
८. श्रीमती मालू बापू डाकी
९. श्री अनिल बळीराम ठाकुर
१०. कै. अन्साबाई उर्फ मानसीबाई बाळाराम मयत तर्फे वारस
१०/१. केशव बाळाराम डाकी
१०/२. श्रीमती हौसाबाई आत्माराम डाकी
१०/३. श्रीमती रेखा कान्हा ठाकूर
१०/४ श्रीमती चैताली मनोहर पाटील
१०/५. श्री भूपेंद्र आत्माराम डाकी
१०/६. श्रीमती कविता भूपेंद्र डाकी
११. श्रीमती प्रेमाबाई भूपेंद्र डाकी
१२. श्रीमती हळूबाई मारुती घरत
१३. श्रीमती गिरीजा श्याम बातेकर
१४. श्री चंद्र बाळकृष्ण डाकी
१५. श्रीमती भारती भरत जोशी
१६. श्रीमती बाबीबाई दत्तात्रय गावंड
१७. श्रीमती नयना प्रकाश पाटील
१८. श्रीमती नागराळकृष्ण डाकी
१९. मिलन जयंता पाटील
२०. श्री जितेंद्र रोहिदास भोईर
२१. श्री दयाधन रोहिदास भोईर
२२. श्री प्राण रोहिदास भोईर
२३. श्री विजय रोहिदास भोईर
२४. श्रीमती बायबाई रोहिदास भोईर
२५. श्रीमती जयश्री जयराम डाकी
२६. श्रीमती दिप्ती जयराम डाकी
२७. श्री परेश धाया गावंड
२८. श्री पांडुरंग हरिदास मोकल
२९. श्री लक्ष्मण हरिदास मोकल
३०. श्री कमलाकर हरिदास मोकल
३१. श्री ईश्वर धाया गावंड
३२. श्री रवींद्र धाया गावंड
३३. श्री निलेश धाया गावंड
३४. श्रीमती भूमिका परेश गावंड
३५. श्री बाबुराव जगन्नाथ ढमाल
३६. श्री अफजल रमजान अली देवजानी
३७. श्री मोतीराम बाळाराम म्हसकर
३८. श्री समाधान हसुराम म्हसकर
३९. श्रीमती लीलावती हसुराम म्हसकर
४०. श्रीमती अनुसया हसुराम म्हसकर
४१. श्री चंद्रकांत बाळकृष्ण डाकी
४२. श्रीमती विठाबाई बाळकृष्ण डाकी
४३. श्री हेमंतदास विशवनदास
४४. श्री भालचंद्र यशवंत पाटील
४५. श्री प्रकाश जयवंत पाटील
४६. श्री मदन यशवंत पाटील
४७. श्रीमती चारू यशवंत पाटील
४८. श्रीमती बायमा यशवंत पाटील
४९. श्री मनोहर माया पाटील
५०. श्री अमृत माया पाटील
५१. श्रीकृष्णा माया पाटील
५२. श्री विलास माया पाटील
५३. श्रीमती आहिल्या माया पाटील
५४. श्री राजू जनार्दन पाटोल
५५. श्रीमती गुलाब भास्कर म्हसकर
५६. श्री नितेश वसंत पाटील
५७. श्रीमती रंजना वसंत पाटील
५८. श्रीमती रंजना वसंत पाटील
५९. श्री नारायण महादेव पाटील
६०. श्री जयवंत महादेव पाटील
६१. श्री भागीरथ महादेव पाटील
६२. श्रीमती उषा किशोर पाटील
६३. श्रीमती प्रियदर्शनी किशोर पाटील
६४. श्री सुदर्शन किशोर पाटील
६५. श्रीमती कविता गजानन कटेकर
६६. श्री प्रशांत धाया दोशी
६७. श्री अली अजगर अफजल देवजानी
६८. श्री आली अजगर अफजल देवजानी
६९. श्री हरी नारायण ठाकूर
७०. श्री केशरीनाथ बाबू मोकल
७१. श्री बाळू बाबू मोकल
७२. श्रीम वत्सला कमलाकर ठाकूर
७३. श्रीमती जोमिबाई कमलाकर ठाकूर
७४. श्रीमती शोभा केशरीनाथ मोकल
७५. श्री अश्विन केशरीनाथ मोकल
७६. श्री सज्जन केशरीनाथ मोकल
७७. श्रीमती बारकूबाई केशरीनाथ मोकल-सर्व राहणार बोरखार, ता उरण, जिल्हा रायगड
७८. मा जिल्हा अधीक्षक भूमी अभिलेख रायगड मु अलिबाग

**विषय :** महाराष्ट्र जमिन महसूल अधिनियम १९६६ कलम २४७ अन्वये अपील अर्ज व विलंब माफी अर्ज मौजे विंधणे, ता उरण येथील सर्व्हे नंबर १४४/७ या मिळकतीबाबत जिल्हा अधीक्षक भूमी अभिलेख, रायगड यांचेकडील आदेश क्र./अपील एस आर ९२५/ता. उरण/जिल्हा रायगड/२०२२ अलिबाग दि २९/०४/२०२२
**संदर्भ-**आपला दिनांक-१९/०१/२०२६ रोजीचा अपील अर्ज व त्रुटी पूर्तता दिनांक ०४/०५/२०२६
महाशय/बाईसाहेब,

**महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ मधील कलम २४७ अन्वये अपील अर्ज,**

अपीलदार यांनी मौजे विंधणे, ता उरण येथील सर्व्हे नंबर १४४/७ या मिळकती बाबत जिल्हा अधीक्षक भूमी अभिलेख, रायगड यांचेकडील आदेश क्र. अपील एस आर ९२५/ता उरण/ जिल्हा रायगड/२०२२ अलिबाग दि.१८/०५/२०२२ रोजीचे आदेशाविरुद्ध अपील अर्ज दाखल केलेले असून त्यामधील जाबदार यांना दि.०१/०२/२०२५ रोजीच्या आगावू नोटीशीने कळवून त्यामधील जाबदार २ ते ७७ यांना त्यांचे पत्त्यावर पाठविलेली सुनावणीची नोटीस बजावली गेली नसल्यामुळे, तसेच अपील अर्ज क्र. २२१/२०२५ चे प्रकरणी दिनांक ०८/०९/२०२६ दुपारी १२.०० वाजता सुनावणीस जाबदार २ ते ७७ हे गैरहजर असल्याने सदरच्या मिळकतीबाबत जाबदार २ ते ७७ यांनी अथवा त्यांच्या कायदेशीर वारसाने किंवा त्यांचे प्रतिनिधी यांनी दि १७.११.२०२६ रोजी दुपारी १२.०० वाजता उपसंचालक भूमि अभिलेख, कोंकण प्रदेश, मुंबई, डी.डी. बिल्डींग १ ला मजला, जुने जकात घर, शहीद भगतसिंह मार्ग, फोर्ट मुंबई- ४००००१ या पिठासनासमोर हजर राहून आपले म्हणणे मांडावे, अन्यथा त्यांचे काही म्हणणे नाही असे समजून त्यांचे अनुपस्थितीत पुनरीक्षण अर्जाची सुनावणी घेण्यात येईल व निर्णय घेतला जाईल याची नोंद घ्यावी

जाबदार २ ते ७७ यांना अथवा त्यांचे कायदेशीर वारस यांना प्रस्तुत अपील अर्ज दि. १७.११.२०२६ रोजी दुपारी १२.०० वाजता सुनावणीस सुनावणीकामी हजर रहाणेसाठी सदरची जाहिर नोटीस प्रसिद्ध केली असे.

सही/-
**(अनिल माने)**
**उपसंचालक भूमि अभिलेख**
**कोकण प्रदेश मुंबई**

## नावात बदल

मी खाली सही करणार श्री.रुपेश गणेश चौधरी रा.चौक, ता.खालापूर जि. रायगड सत्य प्रतिक्षेवर शपथपत्र करतो कि

माझ्या मुलाचे नाव. कु. तस्मय रूपेश चौधरी (Tasmay Rupesh chowdhary) असे असून त्यांची जन्म दि. १०/१०/२०१० अशी आहे सदर मुलाचे जन्म दाखला व शाळेचे दप्तरी चुकीने (Ku.Tasmay Rupesh chowdhari) असे लागले असून खरी स्पेलिंग (chowdhary) असे आहे.

तसेच माझी पत्नीचे नाव. सौ.प्रगती रूपेश चौधरी असुन मुलाचे जन्म दाखल्यावर चुकून सौ.सिद्धी रूपेश चौधरी असे आहे. सदर मुलाचे जन्म दाखल्यांत नावात व स्पेलिंग मध्ये मिस्टेक झाली असून यापुढे (Ku.Tasmay Rupesh Chowdhary) व आईचे नाव सौ.प्रगती रूपेश चौधरी असे समजण्यांत यावे.

**Affidavit No-2652041751268600207266**

## वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि.चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी. **- मुख्य संपादक**

## रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि. अलिबाग
### निविदा सूचना

बँकेची तळोजा शाखेतील जागामालक, श्री. दिनेश मनोहर केणी, मु. गणुशेठ केणी हेरीटाइज, प्लॉट नं. १९, सेक्टर नं. २४, तळोजा, फेज २, गाळा नं. ६,७,८, ता. पनवेल, जि. रायगड यांच्याकडून भाडेतत्वावर घेतलेल्या अंदाजे २२०० चौ. फुट जागेत केलेल्या शाखेचे कार्यालयीन कामकाजाकरीता कौन्टर फर्निचर व इतर अनुषंगिक कामे करून घेणेची आहेत.

| अ.नं. | कामाचे नाव व प्रकार |
|---|---|
| १) | सिव्हील वर्क |
| २) | सिलिंग |
| ३) | ॲल्युमिनिअम कंपोझीट शिट |
| ४) | ग्लास डोअर |
| ५) | फर्निचर |
| ६) | POP पेंटींग फॉल सिलिंग |
| ७) | इलेक्ट्रिकल वर्क |
| ८) | इलेक्ट्रिकल फिक्चर |
| ९) | वॉटर प्रुफिंग, पेस्ट कंट्रोल |
| १०) | वर नमूद केल्याप्रमाणे व त्या अनुषंगाने येणारी इतर कामे |

वरील कामाच्या निविदा बँकेचे मुख्य कार्यालय अलिबाग येथे दिनांक २२-१०-२०२६ पर्यंत कार्यालयीन वेळेत खाली सही करणारे स्वाक्षरीकार याचे नावाने सादर कराव्यात. सहकारी संस्थांकडून आलेल्या निविदांना प्राधान्य देणेत येईल. याबाबत अधिक माहिती बँकेच्या केंद्र कार्यालयामध्ये मिळेल.

कोणतेही कारण न देता कमी अगर जास्त दराची कोणतीही अथवा सर्व निविदा अगर निविदेमधील कोणताही आयटम अगर आयटेमस् कोणत्याही कारणाशिवाय स्विकारणे अथवा नाकारणेचा हक्क बँकेने राखून ठेवला आहे. मुदतीनंतर आलेली निविदा स्विकारली जाणार नाही.

केंद्र कार्यालय अलिबाग — चिफ मॅनेजर
दिनांक - १५-१०-२०२६ — प्रशासन व अस्थापन

## जाहीर नोटीस

सर्व लोकास या जाहीर नोटिशीद्वारे कळविण्यात येते की , आमचे अशिलांनी मौजे नागाव ता. अलिबाग, जि. रायगड येथील खालील वर्णन केलेली बागायत जमीन मिळकत, मिळकतीचे विद्यमान मालक रश्मी राजेश शिंदे व राजेश रमाकांत शिंदे यांचेकडून येणे-जाण्याच्या रस्त्याच्या हक्कांगासह कायम विकत घेण्याचे ठरविलेले आहे. सदरची मिळकत निर्वेध व बोजाविरहित असल्याचा भरवसा मिळकतीचे विद्यमान मालक यांनी आमचे अशिलांस दिलेला आहे. त्या मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भूमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र (हे. आर.) | आकार (रु.पै.) |
|---|---|---|---|
| नागाव | १०४५/३ | ०-१७-५०<br>पो.ख. ०-००-८०<br>एकूण ०-१८-३० | ५.१३ |

वरील मिळकती पैकी पूर्वेकडील क्षेत्र ०-१२-३० हे. आर.

तरीही वरील वर्णन केलेल्या मिळकतीचे संदर्भात कोणाचाही गहाण, दान, बक्षीस, फरोक्त, साठेकारार, बोजा, वहिवाटीचे हक्क, वारसाहक्क, लीज, कोर्टात दावा, मृत्युपत्र, अखत्यारपत्र, भागीदारी, करार-मदार, विसार पावती व हितसंबंध वा कोणत्याही प्रकारे हक्क असल्यास अशा व्यक्तींनी आपल्या हरकती लेखी स्वरूपात, कागदोपत्री पुराव्यासह खाली सही करणार खरेदीदार यांचे ॲडव्होकेट यांचेकडे हि नोटीस प्रसिद्ध झालेपासून १४ दिवसाचे मुदतीत सादर कराव्यात. वरील मुदतीत कोणाचीही, कसल्याही प्रकारची हरकत न आल्यास सदर मिळकत निर्वेध असून तिचे मार्केटेबल टायटल क्लिअर आहे, असे समजून सदरचा खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील. व त्यानंतर आलेल्या कोणत्याही प्रकारची तक्रार आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची कृपया सर्वांनी नोंद घ्यावी.

अलिबाग
दि. १४/१०/२०२६

**ॲड. वैभव गिरीधर पाटील**
जिल्हा न्यायालय अलिबाग, रायगड
मु.सांबरी, पो. कुर्डुस,ता. अलिबाग, जि. रायगड
मो.नं. ८८०५५१८०६८

दि. १३/१०/२०२६

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस कळविण्यात येते की, आमचे अशिल १) सौ.राजश्री मुकुंद म्हात्रे २) श्री.साहिल मुकुंद म्हात्रे यांनी खालील नमुद केलेली मिळकत कायम खरेदी करण्याचे ठरविले आहे. सदर मिळकतीच्या विक्री संबंधीत बोलणी विद्यमान मालक सतिश गणपत पाटील रा.पळी चरी रोड, सोडा फॅक्टरी समोर, पो. पोयनाड, ता.अलिबाग जि. रायगड यांचेसोबत झालेली आहे. सदर मिळकत ही निर्वेध व बोजाविरहित असल्याचा भरवंसा आमचे अशिलांस विद्यमान मालक यांनी दिला असून सदर मिळकतीच्या विक्री व्यवहारास कोणाचीही कसलीही हरकत असल्यास त्याची खातरजमा करणेकामी जाहिर नोटीस प्रसिद्ध करण्याचे काम आमचेकडे दिलेले आहे. त्या मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे,

**-: मिळकतीचे वर्णन :-**

| मौजे | भुमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र (हे.आर) | आकार |
|---|---|---|---|
| कुरकुंडी कोलटेंभी ता.अलिबाग | ३१ | एकुण ०-७६-०० | १.६२ |

वर वर्णन केलेल्या मिळकतीपैकी लिहुन देणार सतिश गणपत पाटील यांच्या हिश्यातील क्षेत्र ०-१५-६० हे. आर आकार ०.३३ रू.पै ही मिळकत या जाहीर नोटीसीचा विषय आहे.

तरी वरील मिळकती संदर्भात कोणाचाही गहाण, दान, बक्षीस, लिज, फरोक्त, पोटगी, साठेकरार, वहिवाटीचे जाण्यायेण्याचे मार्ग, वारसा हक्क आदी कोणत्याही प्रकारे हक्क व हितसंबंध असल्यास व त्यांची वरील मिळकतीच्या विक्री व्यवहारास हरकत असल्यास त्यांनी त्यांची हरकत योग्य त्या मुळ सही शिक्याची कागदोपत्री पुराव्यानिशी ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून होणाऱ्या १४ (चौदा) दिवसांचे मुदतीत खालील सही करणार याजकडे कळवावी. येणेप्रमाणे विहित मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत न आल्यास सदरची मिळकत निर्वेध व बिनजोखमी आहे असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीचा विक्री व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही. याची तमाम जनतेने नोंद घ्यावी हे कळावे.

**ॲड. आशिष नरेंद्र म्हात्रे**
मु.(पळी आंबेघर), पो.पोयनाड
ता.अलिबाग, जि.रायगड.
मोबा. नं.९२७३२७३८४३/९६३७२७००१९

## रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि. अलिबाग
### निविदा सूचना

बँकेच्या इंदापूर शाखेकरीता मालकी हक्काने खरेदी केलेल्या ७५० चौ. फुट स्व मालकीच्या जागेत केलेल्या शाखेचे कार्यालयीन कामकाजाकरीता कौन्टर फर्निचर व इतर अनुषंगिक कामे करून घेणेची आहेत.

| अ.नं. | कामाचे नाव व प्रकार |
|---|---|
| १) | सिव्हील वर्क |
| २) | सिलिंग |
| ३) | ॲल्युमिनिअम कंपोझीट शिट |
| ४) | ग्लास डोअर |
| ५) | फर्निचर |
| ६) | POP पेंटींग फॉल सिलिंग |
| ७) | इलेक्ट्रिकल वर्क |
| ८) | इलेक्ट्रिकल फिक्चर |
| ९) | वॉटर प्रुफिंग, पेस्ट कंट्रोल |
| १०) | वर नमूद केल्याप्रमाणे व त्या अनुषंगाने येणारी इतर कामे |

वरील कामाच्या निविदा बँकेचे मुख्य कार्यालय अलिबाग येथे दिनांक २२-१०-२०२६ पर्यंत कार्यालयीन वेळेत खाली सही करणारे स्वाक्षरीकार याचे नावाने सादर कराव्यात. सहकारी संस्थांकडून आलेल्या निविदांना प्राधान्य देणेत येईल. याबाबत अधिक माहिती बँकेच्या केंद्र कार्यालयामध्ये मिळेल.

कोणतेही कारण न देता कमी अगर जास्त दराची कोणतीही अथवा सर्व निविदा अगर निविदेमधील कोणताही आयटम अगर आयटेमस् कोणत्याही कारणाशिवाय स्विकारणे अथवा नाकारणेचा हक्क बँकेने राखून ठेवला आहे. मुदतीनंतर आलेली निविदा स्विकारली जाणार नाही.

केंद्र कार्यालय अलिबाग — चिफ मॅनेजर
दिनांक - १५-१०-२०२६ — प्रशासन व अस्थापन

## तहसिलदार तथा शेतजमिन न्यायाधिकरण, कर्जत यांचे न्यायालयात

पत्ता : प्रशासकिय भवन, पहिला मजला, पोलिस मैदानाजवळ, कर्जत, ता. कर्जत जि.रायगड- ४१०२०१

**जाहीर नोटीस**

३२ग दावा क्रमांक:टेनन्सी/एसआर/११-२०२६
EQJ COURT NO-०००४७/२०२६

१. श्री. गोपाळ नारायण घोडविंदे — अर्जदार
रा. मांडवणे ता. कर्जत जि. रायगड

विरुद्ध

श्री. गजानन देव, वहिवाटदार
१. श्री. भास्कर दत्तात्रेय जोशी — सामनेवाले
२. श्री. पुंडलिक विनायक जोशी
३. श्री. श्रीपाद लक्ष्मण जोशी
रा. मांडवणे ता. कर्जत जि. रायगड

तमाम जनतेस तसेच सामनेवाले/प्रतिवादी यांना या नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, मौजे मांडवणे, ता. कर्जत, जि. रायगड या जमिन मिळकती संदर्भात ३२ ग अन्वये अर्ज दाखल केला आहे. सदर दाव्यामध्ये दिनांक ३०/०७/२०२६ रोजी प्रथम सुनावणी घेण्यात आलेली आहे. त्यानंतर वेळोवेळी सुनावणी घेण्यात आलेल्या आहेत. मात्र सामनेवाले हे या न्यायालयात सुनावणीकामी हजर झालेले नाहीत. सदर दाव्याची पुढील सुनावणी दिनांक १२/११/२०२६ रोजी सकाळी ११.३० वाजता तहसिल कर्जत, जि. रायगड येथे निश्चित करण्यांत आली आहे.

सबब या जाहीर नोटीशीद्वारे सामनेवाले यांना तसेच वरील जमीन मिळकती संबंधित असलेल्या व्यक्तींनी सुनावणीच्या दिवशी तहसिलदार तथा शेतजमिन यांचे न्यायालयात समक्ष आवश्यक त्या सबळ कागदोपत्री पुराव्यांसह लेखी म्हणणे दाखल करावे. सदर विहीत केलेल्या मुदतीनंतर कोणाचीही व कोणत्याही प्रकारची हरकत आल्यास त्यास हे कार्यालय जबाबदार राहाणार नाही यांची नोंद घ्यावी.

**जमिन मिळकतीचे वर्णन**

| तालुका | गावाचे नाव | गट नं./स.नं. | क्षेत्र (हे.आर.) | आकार (रु.पैसे) |
|---|---|---|---|---|
| कर्जत | मांडवणे | १११/२ | ०-८१-८० | २.३८ |
| | | १११/६ | ०-४८-७० | ०.४५ |

सदरची जाहीर नोटीस आजरोजी माझ्या सही व शिक्यानिशी दिली.

ठिकाण : कर्जत
दिनांक : ०८/१०/२०२६

सही/-
**तहसिलदार तथा शेतजमिन न्यायाधिकरण कर्जत**

## जाहिर नोटीस

सर्व जनतेस कळविण्यांत येते की, आमचे अशिलांनी मौजे पाल्हे, ता. अलिबाग, जि.रायगड येथील खालील वर्णन केलेली जिरायत मिळकतीचे विद्यमान मालक १) जयवंत लक्ष्मण नाईक २) नंदकुमार धर्मा नाईक ३) निलेश विजय नाईक ४) प्रकाश धर्मा नाईक ५) विकास धर्मा नाईक ६) शामल शशिकांत नाईक ७) शैलेश विजय नाईक ८) समीर हरीश्चंद्र नाईक ९) सुलोचना धर्मा नाईक १०) सुवर्णा विजय नाईक ११) साक्षी संदीप म्हात्रे १२) मोनीका मोहन राणे यांचेकडून खरेदीखताने विकत घेण्याची ठरविलेली आहे व तशी बोलणी ही चालू आहे. सदरची मिळकत निर्वेध व बोजा विरहीत असल्याचा भरवसा विद्यमान मालकांनी आमचे अशिलास दिलेला आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भुमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र (हे.आर.चौ.मी.) | आकार (रू.पैसे) |
|---|---|---|---|
| पाल्हे, ता.अलिबाग जि.रायगड | ४५ (खाते क्र.७९) | क्षेत्र ०.४६.००<br>पो.ख. ०.०४.५०<br>एकूण ०.५०.५० | ११.८२ |

तरी वरील मिळकतीचे संदर्भात कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, लिज, फरोक्त, साठेकरार, कोर्टात दावा, मृत्यूपत्र, अखत्यारपत्र, भागिदारी, वहिवाट, पोटगी, करार-मदार, विसार पावती, वारसा हक्क, वहिवाटीचा जाण्या-येण्याचा मार्ग, आदी कोणत्याही प्रकारे हक्क व हितसंबंध असल्यास त्यांनी त्यांची हरकत योग्य त्या कागदोपत्री पुराव्यानिशी हि नोटीस प्रसिद्ध झालेपासून १४ दिवसांचे मुदतीत खालील सही करणार खरेदीदारांतर्फे ॲडव्होकेट यांचेकडे लेखी कळवावे. येणेप्रमाणे विहीत मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बिनजोखमी आहे असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीचा खरेदी व्यवहार पुर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची नोंद घ्यावी.

अलिबाग.
दिनांक : १४/१०/२०२६
मान्यतेची स्वाक्षरी
१) जयवंत लक्ष्मण नाईक

**ॲड. सचिन सदानंद पाटील**
मु.७६२/ए/बी, आई बंगला,
शिवसागर वसाहत, कुरूळ
ता.अलिबाग, जि.रायगड
मो. नं. ९८८१९६३७९२४
ई.मेल : sp3589166@gmail.com

## जाहीर नोटिस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, मौजे-वशेणी, तालुका-उरण, जिल्हा-रायगड येथील खाली वर्णन असलेली जमीन मिळकत यांनी विद्यमान मालक व कब्जेदार यांचे कडून कायमस्वरूपी खरेदी करण्याचे ठरवले आहे. सदर मिळकतीचे वर्णन खालील प्रमाणे,

**मौजे-वशेणी, तालुका - उरण, जिल्हा-रायगड येथील**

| मालक | सर्व्हे नंबर | हिस्सा नंबर | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रू.पैसे |
|---|---|---|---|---|
| प्रतिक प्रशांत जोशी<br>धनाजी अनंता मढवी<br>बाळू अनंता मढवी<br>महेश अनंता मढवी | २८ | ६ | १-३३-०० | १.५० |

तरी सदर मिळकतीमध्ये इतर कोणाचाही कोणत्याही प्रकारे साठेकरार, खरेदीखत, कुळखत्यार पत्र, बक्षीस पत्र, गहाण खत, करारनामा अथवा इतर हक्का हितसंबंध अगर सदरील व्यवहारास कोणाचीही कोणत्याही प्रकारे हरकत असल्यास सदर व्यक्तीने आपली लेखी हरकत पुराव्यासह खलील सही करणारे यांचेकडे ही नोटिस प्रसिद्ध झालेपासून १४ दिवसांचे आत नोंदवावी. सदर मुदतीमध्ये हरकत न आल्यास वर नमूद मिळकत निर्वेध आहे असे समजून सदरील व्यवहार पूर्ण केला जाईल. व त्यानंतर येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलावर बंधनकारक राहणार नाही.

दिनांक : १४/१०/२०२६
येणेप्रमाणे जाहीर नोटिस

सही /-
Adv. Aysha Hyka Saleem
ऑफिस- ४०१ - ४०५, आय विंग,
अरेंज प्लाझा, प्लॉट नं. ५२, सेक्टर १५,
सी.बी.डी. बेलापुर, ठाणे, नवी मुंबई ४००६१४
मो. नं. ८६९२०३८५६७

## जाहिर नोटीस

सर्व जनतेस कळविण्यांत येते की, आमचे अशिलांनी मौजे नेहुली, ता. अलिबाग, जि.रायगड येथील खालील वर्णन केलेली बिनशेती मिळकतीचे विद्यमान मालक तृप्ती रमेश आर्ते यांचेकडून खरेदीखताने विकत घेण्याची ठरविलेली आहे व तशी बोलणी ही चालू आहे. सदरची मिळकत निर्वेध व बोजाविरहीत असल्याचा भरवसा विद्यमान मालकांनी आमचे अशिलास दिलेला आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भुमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र (आर.चौ.मी.) | आकार (रू.पैसे) |
|---|---|---|---|
| नेहुली, ता.अलिबाग जि.रायगड | २१/१/२ (खाते क्र.२६०) | क्षेत्र २.८०.०० | २८.०० |

तरी वरील मिळकतीचे संदर्भात कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, लिज, फरोक्त, साठेकरार, कोर्टात दावा, मृत्यूपत्र, अखत्यारपत्र, भागिदारी, वहिवाट, पोटगी, करार-मदार, विसार पावती, वारसा हक्क, वहिवाटीचा जाण्या-येण्याचा मार्ग, आदी कोणत्याही प्रकारे हक्क व हितसंबंध असल्यास त्यांनी त्यांची हरकत योग्य त्या कागदोपत्री पुराव्यानिशी ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून १४ दिवसांचे मुदतीत खालील सही करणार खरेदीदारांतर्फे ॲडव्होकेट यांचेकडे लेखी कळवावे. येणेप्रमाणे विहीत मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बिनजोखमी आहे असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीचा खरेदी व्यवहार पुर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची नोंद घ्यावी.

अलिबाग.
दिनांक : १४/१०/२०२६
मान्यतेची स्वाक्षरी
तृप्ती रमेश आर्ते

**ॲड. सचिन सदानंद पाटील**
मु.७६२/ए/बी, आई बंगला,
शिवसागर वसाहत, कुरूळ
ता. अलिबाग, जि. रायगड
मो. नं. ९८८१९६३७९२४
ई.मेल : sp3589166@gmail.com

## जाहीर नोटीस

माझे आशिल यांनी दिलेल्या माहितीवरून व सांगितलेवरून त्यांचे तर्फे सर्व लोकांस या जाहीर नोटीशीने कळविणेत येते ते खालीलप्रमाणे:-

मौजे-चेंढरे, ता.अलिबाग, जि.रायगड येथील भूमापन क्र. व उपविभाग ३६/१/२/३३, एकूण क्षेत्र २.३२.०० (आर.चौ.मी), आकारणी २३.२० (रु. पैसे) व भूमापन क्र.व उपविभाग : ३६/१/२/३४, एकूण क्षेत्र १.९५.०० (आर.चौ.मी), आकारणी १९.५० (रु.पैसे) या बिनशेती मिळकती आणि त्यामधील ग्रामपंचायत चेंढरे कडील वर्णन असलेले मिळकत क्र.१९४१ ही मिळकत विद्यमान मालक श्रीमती. सत्यभामा तुकाराम सराटे रा.पुणे यांजकडुन जाण्या येण्याच्या रस्त्याच्या हक्कासह माझे अशिलांनी विकत घेण्याबाबत बोलणी झालेली आहे. सदरहू मिळकत ही निर्वेध असल्याचा भरवसा मिळकतीचे विद्यमान मालक यांनी माझे आशिलांस दिला आहे. या उपरही सदरहू मिळकतीत कोणाचाही गहाण, बयाणा पावती, दान, बक्षीस, फरोक्त, साठेकरार, कब्जा, वारसा हक्क, वहिवाटीचे हक्क, कुळ हक्क वा दुरान्वये देखील संबंध असल्यास अशा व्यक्तींनी आपल्या हरकती लेखी स्वरूपात कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार खरेदीदार यांचे वकील यांजकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांचे मुदतीत रजिस्टर पोस्टाने सादर कराव्यात. मुदतीत कोणाचीही, कसलीही हरकत न आल्यास मिळकत निर्वेध आहे, असे समजुन माझे अशिल विद्यमान मालकांबरोबर पुढील व्यवहार ठरवून खरेदीखत पुर्ण करतील. मागाहून कोणाचीही, कसलीही हरकत विचारात घेतली जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

अलिबाग,
दिनांक १४/१०/२०२६

**(ॲड.परेश एम.घरत)**
तळमजला, अशोका शॉपिंग सेंटर,
एस.टी. स्टँड जवळ, अलिबाग
ता.अलिबाग, जि. रायगड ४०२२०१
मो.९८५०४८१२३४

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येत आहे की, आमचे अशिलांनी खालील वर्णन केलेली जमिन मिळकत तीचे विद्यमान मालकांकडून कायमची खरेदी करण्याचे ठरविलेले आहे. तरी नमुद मिळकतीचे वर्णन पुढील प्रमाणे:-

**मौजे - आसल, तालुका - कर्जत, जि. रायगड येथील जमिन मिळकत**

| मालकांचे नाव | सर्व्हे नं. | प्लॉट नं. | क्षेत्र हे.आर.पॉ | आकार रू. पै. |
|---|---|---|---|---|
| मंजुळा प्रकाश शेलार | ८ | १/ई | ०.११.८० | ०.१६ |

सदरची जमिन मिळकत ही वरील मालकांच्या निर्वेध मालकी हक्काची व प्रत्यक्ष ताबेकब्जा वहिवाटीची असून ती विकत देण्याचा त्यांना हक्क अधिकार असल्याने त्यांनी सदरील मिळकत या तदंगभुत हक्क हितसंबंधासह आमचे अशिलांना विकत देण्याचे ठरविले आहे. तरी वर वर्णन केलेली जमिन मिळकती संदर्भात इतर कोणाचाही गहाण, दान, बक्षीस, फरोक्त, साठेकरार, मृत्युपत्रांकीत दान, कुळवहिवाट, बोजा, चार्जलिन वगैरे कोणतेही प्रकारचा हक्कहित संबंध असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाले पासून १५ दिवसांचे आत खाली सही करणार खरेदीदारांतर्फे ॲडव्होकेट यांचेकडे प्रथमदर्शनी पुराव्यासह लेखी हरकती नोंदवाव्यात. मात्र दिलेल्या मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास आमचे अशिल खरेदीखताचा व्यवहार पुर्ण करतील व मुदती नंतर येणाऱ्या हरकती आमचे अशिलांवर कोणतेही प्रकारे बंधनकारक राहणार नाहीत याची सर्वानी नोंद घ्यावी.

ठिकाण : कर्जत
दि. १५/१०/२०२६

खरेदीदारा तर्फे वकील
**ॲड.लक्ष्मण धर्मराज जाधव**
पत्ता. ५०४, गजवक्र रेसिडेन्सी, पाचवा मजला,
कचेरी रोड, कर्जत, ता.कर्जत, जि.रायगड ४१०२०१
मो. ८१४९२११३६६/७७०९१६०५६७

## जाहीर नोटीस

सर्व नागरीकांना या जाहीर नोटीसीद्वारे सुचित करण्यात येते की, आमचे अशिल यांनी खालील वर्णन केलेली मिळकत तिचे मालक श्री.शंभु दयाल अग्रवाल यांचे कडून विकत घेण्याचे ठरविले आहे.

**मौजे. कर्जत, ता. कर्जत, जि. रायगड येथील मिळकत**

| सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र (हे.आर.) | आकार (रू.पै.) |
|---|---|---|---|
| १८ | अ/६/ब | ०-२३-००<br>पो.ख. ०-१९-०० | ०-१९ |

तरी वर वर्णन केलेल्या मिळकतीबाबत इतर दुसरे कोणाचा साठेकरार, खरेदीखत, ताबा कब्जा, वहीवाट, गहाण, दान, बक्षीसपत्र, लिज, वगैरे अथवा अन्य इतर कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून चौदा दिवसांचे आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांजकडे प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह लेखी हरकत कळवावी. मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास सदर मिळकत ही निर्वेध व बोजारहीत आहे असे गृहीत धरून आमचे अशिल खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून येणारी हरकत आमचे अशिलावर बंधनकारक राहणार नाही. कळावे.

दि. १५/१०/२०२६.

**ॲड. समीर हरिश्चंद्र लाड.**
पत्ता - फ्लॅट नं. ३०१, राजलक्ष्मी
अपार्टमेंन्ट, अभिनव ज्ञान मंदीर जवळ,
ता.कर्जत, जि.रायगड- ४१०१०१.
मो. - ९९२१७२२२००.

ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन
१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग
दागिने-नविन डिझाइन्स



मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी-सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.
२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.
मोबाईल : ९८६०६५८५६५

